दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ५ वे अंक –२५५ रविवार,दि.१८ मे २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु | । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-255 | Sunday, Dt.18 May 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# परळीतील धार्मिक कार्यक्रमात मुलींची छेडछाड

## विरोध करणाऱ्या तरुणाचे अपहरण करून संशयितांकडून अमानुष मारहाण





बीड / प्रतिनिधी

परळीमधल्या (जि. बीड) धार्मिक कार्यक्रमात गुंड प्रवृत्तीच्या टोळक्याने मुलींची छेड काढल्याचा गंभीर प्रकार घडला. या गैरवर्तनाला एका तरुणाने विरोध केला. त्यामुळे संतापलेल्या टोळक्याने या तरुणाचे अपहरण करून त्याला अमानुष मारहाण केली असून, या घटनेचा व्हिडिओ तयार केला. तो सोशल मीडियावर व्हायरल झाला असून संपूर्ण जिल्ह्यात संतापाचा उद्रेक झाला आहे.

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्याकांड प्रकरण ताजे आहे. त्यानंतरही बीड जिल्ह्यातल्या घटना थांबायला तयार नाहीत.मिळालेल्या माहितीनुसार, परळी तालुक्यातील जलालपूर गावात अखंड हरिनाम सप्ताहाचे धार्मिक कार्यक्रम सुरू असताना काही युवकांनी महिलांशी गैरवर्तन करत छेडछाड केली. गावकऱ्यांनी त्यांना तत्काळ कार्यक्रमातून बाहेर काढले. परंतु, याचा राग मनात ठेवून आरोपींनी शिवराज हनुमान दिवटे (रा. परळी, जि. बीड) या तरुणाचे पेट्रोल पंपावरून अपहरण केले आणि त्याला लाठ्याकाठ्यांनी व बेल्टने अमानुषपणे मारहाण केली.

आरोपींनीच केला व्हिडिओ

या सर्व घटनेचा व्हिडिओ आरोपींनी स्वतः चित्रीत केला असून तो सोशल मीडियावर व्हायरल करत दहशतीचा प्रयत्न केला. मारहाणीत गंभीर जखमी झालेला शिवराज जीवाची भीक मागत असतानाचा क्षण या व्हिडिओमध्ये स्पष्टपणे दिसून येतो. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, परळी ग्रामीण पोलिस ठाण्यात या प्रकरणी समाधान मुंडे आणि इतर आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तरीही आरोपी मोकाट फिरत असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी व्यक्त केली जात आहे.

शुक्रवारी सायंकाळी सुमारे ४ वाजता शिवराज हा सप्ताह कार्यक्रमावरून परतत असताना, परळी येथील रिलायन्स पेट्रोल पंपाजवळून त्याचे अपहरण करण्यात आले. त्यानंतर टोकवाडी येथील रत्नेश्वर मंदिर परिसरात नेऊन त्याला लाठ्या–काठ्यांनी बेदम मारहाण करण्यात आली.

आरोपी स्थानिक नेत्याशी संबंधित असल्याची चर्चा

या संपूर्ण घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, आरोपी युवकांचे स्थानिक राजकीय नेत्यांशी संबंध असल्याची जोरदार चर्चा आहे. त्यामुळेच पोलिस प्रशासन दबावाखाली असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. नागरिकांनी या घटनेच्या सखोल चौकशीची आणि आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

दमानिया काय म्हणाल्या?

अंजली दमानिया म्हणाल्या की, बीडचे परळी म्हणजे एक दहशतीचा आता अड्डा झालेला आहे. या विषयाला गंभीरतेने घ्यायला हवे. कारण कालची जी मारहाण झाली त्यातली जी सगळी मुले होती ती अतिशय छोटी आणि १८ वर्षांच्या आसपासची होती. त्यांनी केलेली मारहाण बघून ज्याला मारले त्याला ज्या पद्धतीने पाया पडायला लावले हे सर्व बघून असं वाटतंय की ही रिवेंज केस होती.

अंजली दमानिया म्हणाल्या की, वातावरण आता कुठेतरी भलत्या दिशेने जात आहे.

## सोलापूर ते बीड कडे येणाऱ्या बस चालकाकडून अल्पवयीन मुलीला मांजरसुंबा बस स्थानकासमोर मारहाण

बीड/प्रतिनिधी

सोलापूर ते बीड कडे येणारी बस क्रमांक चक-०९-ऋॅ-०९६८ च्या चालकाचे बीड तालुक्यातील मांजरसुंबा बस स्थानकाच्या कॉर्नरवर परिवारासह चहा पिण्यासाठी थांबलेल्या रिक्षा चालका सोबत रिक्षा बाजूला घेण्याच्या कारणावरून वाद झाला होता. या वादात चालकाने मारहाण करत शिवीगाळ करून बस अंगावर घालण्याची धमकी दिल्याने बस चालकाला जॉब विचारण्यासाठी गेलेल्या अल्पवयीन मुलीला देखील त्याने मारहाण केली. यामुळे

### बीड शहरातील बार्शी नाका येथे संतप्त जमावाने बसच्या काचा फोडल्या ?

संतप्त नागरिकांनी बार्शी नाका परिसरात बस अडवली. यावेळी संतप्त जमावाने गाडीवर दगडफेक करून काचा फोडल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

या घटनेत पेठ बीड पोलिसांनी तात्काळ दखल घेत दोघांनाही तक्रार देण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये बोलावून घेतले.दरम्यान हा प्रकार मांजरसुंबा बस स्थानकात घडलेला असताना नागरिकांनी बार्शी नाका परिसरात बस अडवून दगडाने काच फोडल्याचा आरोप बस चालका कडून करण्यात आला आहे. तर चहा पिण्यासाठी थांबलेल्या परिवाराने देखील आरोप करताना म्हटले की,बस चालकाने विनाकारण मांजरसुंबा बस स्थानकाच्या कॉर्नरवर आमच्याशी वाद केला. आमच्या अंगावर जीवे मारण्याच्या हेतूने बस घालण्याचा प्रयत्न करून धमकी दिली. एवढेच नव्हे तर माझ्या अल्पवयीन मुलीला मारहाण करून माझा बुरखा धरून मला ओढून मारहाण केल्याचा गंभीर आरोप केला. या आरोपामुळे पोलीस ठाण्यात देखील काही वेळ तणावाचे वातावरण

## धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात परळी मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सदस्य नोंदणी अभियान जोमात

परळी ।प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली परळी विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सदस्य नोंदणी अभियान जोमात सुरू असून उद्या रविवारी सकाळी नऊ वाजल्यापासून घाटनांदुर येथे सदस्य नोंदणी अभियान संपन्न होणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सदस्य नोंदणीचे जिल्हा परिषद गटनिहाय नियोजन करण्यात आले असून, घाटनांदुर येथील सदस्य नोंदणी अभियानाचे उद्घाटन माजी आमदार संजय भाऊ दौंड तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे

### रविवारी घाटनांदूर येथे होणाऱ्या सदस्य नोंदणीस उपस्थित रहा – विधानसभा अध्यक्ष गोविंदराव देशमुख, शिवाजीराव शिरसाट, राजाभाऊ औताडे यांचे आवाहन

जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या बियाण्यात सर्व पदाधिकारी कार्यकर्ते तसेच विविध आघाड्यांच्या पदाधिकाऱ्यांनी सहभागी होऊन जास्तीत जास्त नागरिकांचे सदस्यत्व पक्षात नोंदवून घ्यावे असे आवाहन परळी विधानसभेचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष गोविंदराव देशमुख अंबाजोगाईचे तालुकाध्यक्ष राजेभाऊ अवताडे तसेच जिल्हा सरचिटणीस शिवाजीराव शिरसाठ यांनी केले आहे. या अभियानास युवक नेते अजय मुंडे, ज्येष्ठ नेते दत्ता पाटील, पांडू तात्या हारे, रंजीत चाचा लोमटे, अजितदादा गरड, जयवंतराव देशमुख, ज्ञानेश्वर बप्पा जाधव, बळवंतराव बावणे, सचिन अपेट, डॉक्टर अजितदादा देशमुख, बाळासाहेब देशमुख, मेहबूब शेख, सुंदरराव साळुंखे, बालासाहेब शेप, शरद बावणे, सुधीर चाटे, बाबुराव जगताप सर, वसंतराव देशमुख, विश्वंभर फड, बंडू गीते, बापूसाहेब गीते, माऊली गरजे, हनुमंतराव गायकवाड, नाथराव घुले, महादेव निळे, अर्जुन जाधव, नामदेव घुले, राखीताई अंधारे, आतार जागीरदार, गणेश देशमुख, शोभाताई कदम, भास्कर गोडबोले, महादेव सोनपीर, रामराव शिरसाट, अरुण नागरगोजे, शिवाजी चव्हाण, बळीराम घोंगडे, वामन बापू जाधव, दादा वैद्य, सुरेश मिसाळ सर, श्रीकृष्ण गीते, मच्छिंद्र वालेकर, बालासाहेब राजमाने, उत्तमराव जाधव, श्रीमंत शिंदे यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

## वीजहानी कमी करण्यासाठी महावितरणची आकडे मुक्तीची महामोहीम

आंबाजोगाई ।प्रतिनिधी

वीजहानी कमी करण्याच्या दृष्टिने अतिवीजहानी असलेल्या वीजवाहिन्यावरील वीजचोरी विरोधात मंगळवारी (दि.१३ मे) राबविलेल्या विशेष महामोहीमेत महावितरणच्या आंबाजोगाई विभागातील सर्व उपविभागाच्या वीजचोरी बहूल भागात राबवलिल्या धडक कारवाईत तब्बल १८६ आकडे बहाद्दरांना महावितरणने चांगलाच दणका दिला आहे. दिवसभर झालेल्या या कारवाईत आकडे टाकून वापरण्यात आलेल्या शेगडया, हीटर व केबल जप्त करण्यात आले.

नियमीत वीजबील भरणाऱ्या वीजग्राहकांना अखंडीत व योग्यदाबाचा वीजपुरवठा व्हावा या उद्देशाने प्रादेशिक कार्यालयाच्या निर्देशानुसार जास्त

(उर्वरीत पान २ वर)



आंबाजोगाई विभागाच्या कारवाईत एकाच दिवसात १८६ वीजचोरांचा पर्दाफाश

## औषधांचा वापर नशेसाठी करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश

### चार आरोपींसह अडीच लाखाचा मुद्देमाल जप्त !

बीड ।प्रतिनिधी

बीड शहर पोलिसांनी मागील वर्षी सहा महिन्यापूर्वी शहरांमध्ये नशेच्या गोळ्या आणि औषध विकणारे रॅकेट पकडले होते. त्यानंतर हा उद्योग बंद पडला होता. परंतु त्यानंतर पुन्हा एकदा नवीन लोकांनी या डोके काढल्याची माहिती बीड शहर पोलिसांना मिळाली होती. यावरून रात्री अकरा वाजता जुना बाजार येथील हाफिस गल्ली येथे फैजान अस्लम खान पठाण याच्या राहते घरी छापा मारला असता तेथे उपचारासाठी असलेले जे औषध गोळ्या आहेत याचा मोठा साठा मिळून आला. हीच औषधे नशा करण्यासाठी लोकांना विकत असल्याची खात्री पटल्याने फैजान खान असलम खान पठाण राहणार हाफिस गल्ली, सोहेल खान युसुफ खान पठाण राहणार, हाफिस गल्ली, शोएब खान ताजुद्दीन खान राहणार हत्तीखाना, शेख फिरोज शेख सादेख राहणार गिराम गल्ली कारंजा यांना मुद्देमाला सह रंगीहात पकडले.त्यांच्या कडून दोन लाख ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या घटनेने खळबळ उडाली आहे.

मागील काही दिवसात शहरांमध्ये अशाप्रकारे अतिशय काटेकोर गुप्तता पाळून नशेचे औषध आणि गोळ्या चोरून लपून विक्री चालू होती. यामध्ये बऱ्याचदा लहान मुलांना सुद्धा अशा प्रकारचे नशेची औषध गोळ्या पुरवल्या जातात. यातून गुन्हेगारीची वाढ होत आहे असे लक्षात आल्यानंतर पोलीस अधीक्षक श्री नवनीत कावत यांनी अशा प्रकारचे रॅकेट शोधून काढून कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यातून कालचा हा छापा मारून कारवाई करण्यात आली आहे.

(उर्वरीत पान २ वर)



बीड शहर पोलिसांची दबंग कामगिरी

## बीडचे जिव्हाळा बेघर निवारा केंद्र राज्यात ठरले सर्वोत्कृष्ट

### जिव्हाळा केंद्राच्या या यशात सर्वांचा सहभाग – वंजारे, वैद्य






बीड ।प्रतिनिधी

राज्यस्तरीय निवारा सनियंत्रण समितीच्या रयत संस्थेद्वारे महाराष्ट्रातील बेघर निवारा केंद्रांचे निरीक्षण करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार त्रिशरण एनलायनमेंट फाउंडेशन या संस्थेने निवारा केंद्राचे निरीक्षण करून अहवाल सादर केला होता. सदर अहवालामध्ये सर्वोत्कृष्ट ठरलेल्या पाच निवारा गृहांची निवड केली आहे. यामध्ये बीड येथील जिव्हाळा बेघर निवारा केंद्रासह, सावली बेघर निवारा केंद्र, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, ग्रेस बेघर निवारा केंद्र बृहन्मुंबई महानगरपालिका, शहरी बेघर निवारा केंद्र अंबरनाथ नगर परिषद, संत गाडगेबाबा बेघर निवारा अकोला, अकोला महानगरपालिका तर मराठवाड्यातील एकमेव

(उर्वरीत पान २ वर)

### यशाचे हे खरे मानकरी...

जिव्हाळा केंद्रास अमोल बडगुजर, शहर अभियान व्यवस्थापक .चंद्रकांत तोडकर, शहर अभियान व्यवस्थापक, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान, (पोलीस खात्यामध्ये पोलीस उपनिरीक्षक पदावर कार्यरत असलेले, राष्ट्रपती पुरस्कार विजेते राजूभाऊ गुळभिले यांच्या पुढाकाराने निवारा केंद्रामध्ये शहरातील दानशूर व्यक्तींच्या मदतीने सर्वात मोठा अन्नदानाचा प्रश्न बऱ्याच अंशी मार्गी लागला. यामध्ये गुळभिले सरांचे आणि पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांचे वेळोवेळी मोलाचे सहकार्य लाभले असल्याचे प्रतिपादन जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे व्यवस्थापक राजू वंजारे, संचालक अभिजित वैद्य, यश वंजारे, काळजीवाहक छाया सरोदे यांनी यावेळी सांगितले.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर,
सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## संपादकीय

# वनांच्या भक्षकांना दणका

राजकीय नेते, नोकरशहा आणि बांधकाम व्यावसायिक एकत्र येऊन वनजमीन कशी गिळंकृत करतात याचे उदाहरण म्हणून पुण्यातील कोंढवा भागातील सुमारे ३० एकर राखीव वनजमिनीच्या प्रकरणाकडे पाहायला हवे. पंचवीस वर्षांपूर्वीच्या या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे, तत्कालीन भाजप-शिवसेना युती सरकारमधील महसूलमंत्री नारायण राणे यांच्यासह तत्कालीन विभागीय आयुक्त आणि उपवनसंरक्षक अशा बड्यांच्या संगनमनताने ही वनजमीन नसल्याची बनावट कागदपत्रे सादर करून झालेला काही अब्ज रुपयांच्या जमिनीचा गैरव्यवहार समोर आला आहे. धोरणकर्ते मंत्री, बडे अधिकारी आणि बांधकाम व्यावसायिक हे राज्यातील जंगलांचे भक्षक बनत असल्याचे या निकालातून समोर आले आहे.

नवे सरन्यायाधीश न्या. भूषण गवई यांनी पदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर दिलेला हा पहिलाच निकाल. मात्र, पुण्यातला हा प्रकार म्हणजे हिमनगाचे टोक असावे, असे राज्यातील विविध शहरांच्या परिसरात उभी राहणारी सिमेंटची जंगले पाहून म्हणावे लागेल. त्यामुळेच न्यायालयाने नियुक्त केलेल्या उच्चाधिकार समितीने या प्रकरणातील संबंधितांवर कारवाईची शिफारस केली. सोबतच महसूल विभागाच्या ताब्यात वनीकरणासाठी आरक्षित असलेली जमीन खासगी व्यक्ती किंवा संस्थांना वनीकरणाव्यतिरिक्त अन्य काही कारणांसाठी देण्यात आली आहे का, याची तपासणी करण्यासाठी विशेष तपास पथकाच्या स्थापनेचे आणि अशा जमिनींचा ताबा घेऊन ती वन विभागाकडे सुपूर्द करण्याचे; तसेच असे काही प्रकार आढळल्यास त्याची किंमत संबंधित जमीनधारकांकडून वसूल करण्याचे आणि ती रक्कम वनीकरणासाठी वापरण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

पुण्यातील कोंढवा बुद्रुक परिसरातील ही जागा राखीव वनक्षेत्र म्हणून अधिसूचित करण्यात आली होती. राणे यांनी ही संपूर्ण जमीन मालक चव्हाण यांना देण्याचा निर्णय दिला. वर्षभरातच तत्कालीन विभागीय आयुक्तांनी ही जागा एका गृहनिर्माण सोसायटीला निवासी उद्देशासाठी विकण्याची परवानगीही मालकास दिली; लगोलग जिल्हाधिकाऱ्यांनीही या जागेचा वापर बिगरशेती उद्देशाने, म्हणजेच निवासी बांधकामासाठीही परवानगी दिली. भरीस भर म्हणून तत्कालीन उपवनसंरक्षकांनीही या सगळ्या उद्योगासाठी 'ना हरकत प्रमाणपत्र' देऊन टाकले. पुढे महापालिकेने बांधकाम परवाना दिला आणि वन व पर्यावरण मंत्रालयानेही या निवासी-व्यावसायिक बांधकामासाठी पर्यावरण मान्यता दिली. त्यामुळे वन संरक्षण कायद्याचे उल्लंघन झाल्याची याचिका दाखल करण्यात आली होती. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या केंद्रीय उच्चाधिकार समितीने या जमिनीच्या विक्रीला दिलेली परवानगी रद्द करण्याची शिफारस केली. तत्कालीन महसूलमंत्री, विभागीय आयुक्त आणि उपवनसंरक्षकांवर फौजदारी कारवाईची शिफारसही केली.


महाराष्ट्र हे औद्योगिकरण व नागरीकरणामध्ये देशातील आघाडीवरचे राज्य आहे. मात्र, याच नागरीकरणाच्या रेट्यात राज्यातील वन जमिनींवर अतिक्रमण होत आहे. राज्यातील वनाच्छादनाचे प्रमाण सुमारे २० टक्के असून त्यात राज्याचा देशात २८वा क्रमांक लागतो. विशेषत: पुणे, मुंबई आणि नाशिक परिसरात शहरांच्या विस्तारामध्ये वन क्षेत्र झपाट्याने कमी होत आहे. अनेक जागा कागदावर 'वन क्षेत्र' असून, प्रत्यक्षात तेथे सिमेंटची जंगले उभी राहिल्याची अनेक प्रकरणे असू शकतात. मुंबईत मेट्रो कारशेडसाठी जंगलतोडीला नागरिकांनी तीव्र विरोध केला होता. वन क्षेत्र घटण्याचे परिणाम प्रदूषण, हवामानबदल, पावसाचे बदलते प्रमाण आणि जैवविविधता धोक्यात येण्यातून समोर येत आहेत. अनेक शहरांमध्ये बिबट्यासारखी श्वापदे मानवी वस्तीत येण्याचे प्रकार, हा वनक्षेत्र घटल्याचाच दुष्परिणाम आहे. पुण्यातील प्रकरण जागरूक नागरिकांमुळे उघडकीस आले आणि सर्वोच्च न्यायालयात अनेक वर्षे लढा दिल्याने हे वन क्षेत्र वाचले; मात्र अनेकांच्या नशिबी हा न्याय असेलच, अशी हमी देणारी व्यवस्था नाही.

## आपत्तीचा पावसाळा / ००३ सर्पदंश

# नको ती विषाची परीक्षा!

साधारणत: पाऊस पडण्यास सुरुवात होते त्यावेळी जमीन पूर्णतः भिजत नाही अशा आरंभिक काळात शेतात तसेच ग्रामीण भागात अनेक ठिकाणी साप बिळातून बाहेर पडण्यास सुरुवात होते. अगदी सारे साप विषारी नाहीत मात्र विषारी साप चावण्याच्या घटना खास करून पावसाळ्यात वाढतात आणि साप कोणत्या प्रजातीचा आहे त्यावर त्याच्या विषाचे परिणाम होतात आणि यातही प्राणहानी होते.

आता विषाची परीक्षा कशाला म्हणत आपणही याबाबत जाणून घेणे आणि खबरदारी बाळगणे यासाठीच आवश्यक ठरते. आपल्या भागात साधारणपणे आढळणारे विषारी साप आपल्याला ओळखता आले पाहिजेत साप हात-पाय नसलेला सरपटणारा प्राणी आहे. त्याला उपजीविकेसाठी जे शिकार करावी लागते त्यात त्याला या विषाचा उपयोग होत असतो. साप आपल्या भक्षाच्या जवळ आल्यावर चावा घेतो आणि भक्ष्यात दातांच्या पोकळीतून विष सोडतो आणि याच विषाच्या भक्ष्याचा मृत्यू झाल्यावर साप त्याला गिळत असतो.




प्रसंगी संरक्षण यंत्रणेसारखाही या विषाचा वापर होत असतो. यात मनुष्य प्राणी सापाचे भक्ष्य नाही ही महत्त्वाची बाब आहे. मात्र साप आणि मनुष्य यांचा संपर्क आल्यास साप संरक्षण म्हणून माणसाला दंश करतो (चावतो) यामध्ये विषाच्या प्रभावाने माणसाचा मृत्यू होतो. आणि असे प्रसंग पावसाळ्यात अधिक प्रमाणात समोर येतात. कधी काळ निबिड जंगलांनी व्यापलेल्या आपल्या भारत देशाला संपूर्ण जग वाघांचा आणि सापांचा देश म्हणून ओळखत होता. वाघांची संख्या कमी होत होत आता त्यांच्या रक्षणासाठी अभयारण्याची रचना सुरू करावी लागली आहे मात्र सापांबाबत फारसा काही फरक पडलेला नाही.

महाराष्ट्रात विषारी सापांचे प्रकार जास्त नाहीत परंतु २००१ ते २०१४ या १५ वर्षाच्या कालावधीत राज्यात सर्पदंशामुळे ५६ हजार जणांचा मृत्यू झाल्याची आकडेवारी उपलब्ध आहे. देशाची एकूण आकडेवारी समोर ठेवल्यास साधारण १२ टक्के मृत्यू एकट्या महाराष्ट्रात झाले. आता याबाबत अधिक सखोल अभ्यास सुरू आहे तरीही ढोबळमानाने वर्षाकाठी महाराष्ट्रात ४९० मृत्यू होतात.आपल्याकडील विषारी साप कोणते हे जाणून घेताना सर्वप्रथम नाग अर्थात किंग कोब्रा ची आठवण येते. महाराष्ट्रात नागाप्रमाणेच फुरसे ही एक अत्यंत विषारी प्रजाती आढळते. याचा वावर बहुत करून संह्यांद्री पर्वतरांगा आणि लगतच्या कोकणात अधिक आहे. तपकिरी किंवा पिवळसर रंग व त्यावर काळे ठिपके असणारा हा साप सहजपणे हल्ला करित नाही.

घोणस अर्थात याचा दंशाने महाराष्ट्रात सर्वाधिक मृत्यू होतात. याचे प्रमाण नागाच्या दंशाने होणाऱ्या मृत्यूपेक्षा खूप जास्त आहे. हा साप अजगराची साधर्म्य असणारा साप आहे. अजगर समजून याला पकडण्याच्या प्रयत्नात अनेक जण प्राण गमावतात. ग्रामीण भागात याला परड नावाने ओळखले जाते. हा नागापेक्षाही अधिक आक्रमक असतो.

समोरील बाजूस निमुळते त्रिकोणी तोंड आणि शरीरावर विशिष्ट आकाराची माळ असणारा हा घोणस धोका जाणवल्यास जो आवाज काढतो तो प्रेशर कुकरच्या शिट्टी सारखा असतो. मण्यारही आपल्याकडे आढळणारी विषारी सापाची आणखी एक प्रजाती आहे. याचे २० नागाच्या विष नागापेक्षाही १५ पट अधिक घातक आहे. हा साप आपल्या तोंडातून भक्ष्यावर विषयाचा फवारा करतो. अतिशय चपळ साप असून याचा रंग काळपट असतो व शरीरावर पांढऱ्या रंगाच्या गोलाकांराची रचना असते.

सापांची ओळख झाली पण बचावाचे काय तर हा साप तसा घाबरट प्राणी असल्याने अडगळीत व अंधारात दडून बसलेला असतो. अशा अडगळीत तपासणी शिवाय हात टाकणे म्हणजे मृत्यूला निमंत्रण ठरू शकते.लोहे को लोहा काटता है तसा याचा उपाय देखील विषाला वीष संपवते याच पद्धतीचा आहे. विषारी साप चावल्यावर जे इंजेक्शन (न्टी व्हेनम) दिले जाते ते सापाच्याच विषापासून तयार केलेले असते.

साप चावल्यावर दोन दातांचे व्रण स्पष्ट दिसतात असे दिसल्यास घाबरून न जाता जिथे साप चावला आहे तिथे रक्तपुरवठा हृदयाकडे होणार नाही अशा पद्धतीची मोठी पट्टी बांधावे व तत्काळ जवळचा दवाखाना गाठावा. शासकीय रुग्णालयात सर्पदंशावरील न्टी व्हेनम उपलब्ध करून ठेवलेले असते.

हिंदी चित्रपटातील दृश्यप्रमाणे जखमेतून विष तोंडाने शोषण्याचा प्रयत्न करू नये. आयुष्य म्हणजे चित्रपट नाही. असे करणाऱ्या व्यक्तीलाही विषाची बाधा होऊन त्याही व्यक्तीचा मृत्यू होतो. ग्रामीण भागात गावातील भगताकडे व तांत्रिकाकडे नेणे असे प्रकार केले जातात. कोणत्याही तंत्र व मंत्राने विष उतरत नाही. ते वैद्यकीय उपचारानेच नियंत्रणात आणून विषबाधा झालेल्या व्यक्तीचे प्राण वाचवता येतात.

सापाला शेतकऱ्यांचा मित्र म्हणतात कारण धान्याची नासाडी करणाऱ्या उंदराचा तो नायनाट करतो म्हणून दिसला साप की धोपट काठी असेही करू नका. साप विषारी असेल तर दूर राहा. वनविभागाची मदत घेऊन त्याला त्याच्या अधिवासात सोडा. इतकी माणुसकी किमान आपण दाखवा.

**–प्रशांत विजया अनंत दैठणकर**
(जिल्हा माहिती अधिकारी)बीड
चलभाषा क्र. ९८२३१९९४६६

# २० कोटीतच आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांची बोळवण

**वित्त व नियोजन मंत्री अजितदादा पवारांच्या राजीनाम्याची मागणी – डॉ.गणेश ढवळे**

बीड ।प्रतिनिधी

अवकाळी पाऊस ,कधी कोरडा तर कधी ओल्या दुष्काळामुळे नापिकी, कर्जबाजारीपणा आणि बँकांचा कर्ज परतफेडीचा तगादा, मालाला हमीभाव नसणं या प्रमुख कारणांमुळे शेतकरी मनोधैर्य खचलेला शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतो. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना १ लाख रुपयांची शासकीय मदत दिली जाते. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार १५ दिवसांच्या आत मदत मिळणे बंधनकारक असताना महिनोंमहिने शासनाने निधी उपलब्ध करून न दिल्याने मिळत नाही. वारंवार निवेदने आणि आंदोलने केल्यानंतर सरकारला जाग येते आणि सरकार तुटपुंज्या निधीची तरतूद करते. दि.१५ मे रोजी संपुर्ण राज्यासाठी केवळ २० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असुन या निधीतून प्रलंबित सर्व शेतकऱ्यांच्या वारसांना मदत मिळणे शक्यच नाही.

परीणामी शेतकऱ्यांच्या वारसांना मदतीसाठी आणखी प्रतिक्षा करावी लागणार आहे. केवळ २० कोटीतच शासनाने आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांची बोळवण केल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्त्यांनी दिली वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार हे सोमवार रोजी बीड जिल्हा दौऱ्यावर असुन जिल्हा नियोजन समितीची बैठक प्रशासनातील विविध बाबींचा आढावा घेण्यासाठी येणार असुन शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणाच्या निषेधार्थ निदर्शने करण्यात येणार असल्याचे निवेदन सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर,शेख युनुस, शिवशर्मा शेलार,शेख मुबीन, पांडुरंग हराळे आणि बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, उपाध्यक्ष इंटक संदिप झिंजुर्के यांनी तहसीलदार ( महसूल) जिल्हाधिकारी कार्यालय बीड अविनाश शिंगटे यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड यांना दिले आहे.



६ विभागांसाठी केवळ २० कोटी...

राज्यातील कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर या सहा विभागांसाठी केवळ २० कोटी निधी उपलब्ध करून दिला आहे. यामध्ये विभागीय आयुक्त स्तरावरून वितरीत झालेला निधी याप्रमाणे..

मागील तीन महिन्यात फक्त मराठवाड्यात सुमारे २६९ शेतकऱ्यांच्या आत्महत्या..

मराठवाड्यात १ जानेवारी २०२५ ते मार्च २०२५ या ३ महिन्यात २६९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे. यात बीड जिल्हा ७१ ,लातुर १८, धाराशिव ३१, छत्रपती संभाजीनगर ५०, जालना १३, परभणी ३३, हिंगोली ३७ अशा एकुण २६९ शेतकरी आत्महत्यांची नोंद आहे.बीड जिल्ह्यात १ जानेवारी २०२५ ते ३१ एप्रिल २०२५ या ४ महिन्यात ९२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असुन बीड जिल्ह्यातील ५५ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबिय मदतीच्या प्रतिक्षेत आहेत. दरम्यान छत्रपती संभाजीनगर विभागासाठी केवळ ४.९२ कोटी निधी उपलब्ध करून दिला आहे.या विभागात बीडसह ८ जिल्हे येतात.यातुन कोणत्या जिल्ह्याच्या वाट्याला किती येतात ? यातुन सर्व शेतकरी कुटुंबियांना मदत मिळणार का ? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# केज शहर अपघातमुक्त होणार आहे काय ?लोक प्रतिनिधींनी पुढाकार घ्यावा – पत्रकार पांडुरंग कसबे

केज ।प्रतिनिधी

शुक्रवारी दुपारी शहरात अपघाताची जी घटना घडली ती अतिशय संतापजनक होती. मीना प्रवीण घोडके या महिला जागीच ठार झालेल्या असून १९ लोक यामध्ये जखमी झालेले आहेत.या घटने पासून काय धडा घेतला याचे आत्मपरीक्षणहोणे गरजेचे आहे.केजशहरा मध्ये राहणाऱ्या तसेच आजुबाजूच्याखेड्यातून येणाऱ्या प्रत्येक नागरिकांची जबाबदारी आहे की,आपली वाहने रोडवरती उभी राहायला नकोत.शहरात अनेक ठिकाणी प्रशासकीय जागा रिकाम्या आहेत शक्यतो तेथे आपली गाडी पार्क करावी. सद्या जरी फूटपाथची व्यवस्था नसली तरी नवीन बनवलेल्या नाल्यावरूनच चालावे. नागरिकांनी मुख्यरस्त्या वरून शक्यतो चालणे टाळावे.ही झाली नागरिकांची सजगता. परंतु याठिकाणी अनेक छोटे व्यापारी मग ते फळगाडेवाले असतील रस्त्यावर किंवा रस्त्या च्या कडेला बसून भाजीपाला विकणारा असेल असे अनेक व्यापारी आहेत जे मुख्य रस्त्यावर आपला व्यवसाय करतात, त्यांनी नालीच्या मागे बसून आपला व्यवसाय करावा.नालीवरून चालणाऱ्यांना कुठलाही त्रास होणार नाही याची व्यापारी बंधुनी काळजी घ्यावी.हा प्रत्येकाच्या नैतिकतेचा भाग आहे. थोडीशी सदविवेकबुद्धी वापरून आपला व आपल्यामुळे इतरांचा जीव धोक्यात येणार नाही याची सर्वांनीच काळजी घेतली पाहिजे. पोलिस प्रशासनाने कठोर कारवाई करत रस्त्यावर येणाऱ्या ट्राफिकचे नीट व्यवस्थापन करायला हवे.नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी जेणेकरून भविष्यात असे प्रकार होणार नाहीत.सजग नागरिक अशा संभाव्य घटना बद्दल जेव्हा पोलिस प्रशासनाला कळवीत असतात,तेव्हा त्यांनी त्वरीत क्शन घेणे गरजेचे असते.तात्काळ घेतलेल्या क्शनमुळे पुढील संभाव्य घटना टळतात हे अनेकदा सिद्ध झालेले आहे. प्रशासनाने कालच्या घटनेतील कंटेनर मागेच अडवला असता तर पुढील अनर्थ टळला असता.असो,या जरतर च्या जरी गोष्टी वाटत असल्या तरी गांभीर्य मात्र सखोल आहे.



स्थानिक प्रशासनाला यासंदर्भात जाग कधी येणार? आमच्या लोक प्रतिनिधींना अजून असे किती अपघात बघायचे आहेत.आपल्याघरातील व्यक्ती गमावल्यानंतरच आपल्याला जाग येणार आहे काय? वर्षभरात कित्येकजण अपघातात मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे. अशी अवजड वाहने जेव्हा शहरातून वाहतूक करतात तेंव्हा जीव मुठीत धरून येथील नागरिक, शाळकरी मुले,महिला, वावरतात.वाहतुकीला पर्यायी व्यवस्था आपण कधी देणार आहोत.या साठी लोकप्रतिनिधी केव्हा पाठपुरावा करणार आहेत.रोड अथॉरटीने तात्काळ शहरांतर्गत ठिक ठिकाणी गतिरोधक तयार करणे गरजेचे आहे.सुव्यवस्थित फुटपाथ तयार होणे अत्यावश्यक आहे. शहरामध्ये ब्यॅरिकेटींग लावणे आवश्यक आहे.

यापूर्वी अनेकसंघटनांनी व काही पक्षांच्या कार्यकर्त्यांनी केजला बायपास रोड व्हावा यासाठी निवेदने दिलेली आहेत.सर्वसामान्य नागरिकांमधून ही तोच सूर निघताना दिसत आहे.केज शहरासाठी रिंगरोड,बायपास रोड, किंवा उड्डाणपूल होणे अत्यंत गरजेचे आहे. आत्तातरी येथील लोक प्रतिनिधी यामध्ये किती पुढाकारघेतात.

## पान १ वरून...

**वीजहानी कमी करण्यासाठी ..**

वीजहानी असलेल्या वीजवाहिन्यांवरील वीजचोरीचा पर्दाफाश करण्यासाठी लातूर परिमंडळाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले, अधीक्षक अभियंता प्रेमसिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली आंबाजांगाई विभागाचे प्रभारी कार्यकारी अभियंता संदीप चाटे यांनी धडक मोहीम हाती घेतली असून जास्त वीजहानी असलेल्या वीजवाहिन्यांवर आकडे टाकून वीजचोरी करणाऱ्यां विरोधात धडक कारवाई करण्याचे सर्व उपविभागांना निर्देश दिले आहेत. त्यानुसार मंगळवारी (दि.१३) राबविलेल्या धडक कारवाईत विभागातील आकडे टाकून वीजवापरणाऱ्यांवर कारवाई करत आकडे मुक्त परिसर मोहिम राबविण्यात आली. या धडक मोहिमेत आंबाजोगाई उपविभागातील संशयास्पद अशा १६० वीजग्राहकांची तपासणी केली असता ६३ वीजग्राहक वीजचोरी करत असल्याचे आढळून आले. तर तेलगाव उपविभागातील ६० वीजग्राहकांची तपासणी केली असता १७ वीजग्राहक, माजलगाव उपविभागातील ८७ वीजग्राहकांची तपासणी केली असता ३७ वीजग्राहक तसेच धारूर उपविभागातील २७ वीजग्राहकांची तपासणी केली असता १० वीजग्राहक वीजचोरी करत असल्याचे आढळून आले. यासर्व वीजचोरांवरती वीजकायदा २००३ अनुसार कलम १३५ व १२६ अन्वये कारवाई करण्यात आली असून वीजचोरीच्या बिलाची व दंडाची बीले तयार करून देण्याची कारवाई सुरू असून दिलेली बिले न भरल्यास वीजचोरीचे गुन्हे गुन्हे दाखल करध्यात येणार आहेत. या धडक कारवाईत विभागातील सर्व अभियंते व कर्मचाऱ्यानी सहभाग नोंदवला. यापुढेही वीजचोरी विरोधातील मोहिम अधिक कडक स्वरूपात राबवली जाणार असून वीज कायद्यान्वये दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

वीजगळती कमी करण्याच्या दृष्टीने आकडेमुक्त विभाग ही संकल्पना अंमलात आणण्यासाठी वीजचोरी विरोधात धडक मोहीम सातत्याने यापुढेही राबविली जाणार आहे. वीजचोरी करणे हा दंडात्मक गुन्हा असून महावितरण मागेल त्याला वीजपुरवठा देण्यास बांधील आहे. नागरिकांनी अधीकृतरित्याच वीज वापरावी. – संदीप चाटे, कार्यकारी अभियंता आंबाजोगाई विभाग

**औषधांचा वापर नशेसाठी...**

सदरील कारवाई पोलीस अधीक्षक श्री नवनीत कावत अपर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर उपविभागीय पोलिस अधिकारी श्री विश्वंभर गोल्डे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री शितल कुमार बल्लाळ, पोलीस अंमलदार सचिन अलगट, जयसिंग वायकर, सुशेन पवार, मीरा रेडेकर, मनोज परजणे, अश्फाक सय्यद, सखाराम माने यांनी केली आहे. ही कारवाई केल्यामुळे बीड शहर पोलीस स्टेशनचे नागरिकाकडून कौतुक होत आहे.

या नशेमुळे बाल वयातच मुले बिघडू लागली ?

खोकला, सर्दी साठी काही औषधे आणि गोळ्या यांचे प्रमाण जर एकावेळी जास्त प्रमाणात घेतले तर ते औषध नशेचे काम करते. अशी औषधं पिल्यानंतर त्याचा वास येत नाही. नशा केलेली आहे हे कोणाला कळत नाही.मात्र ज्याने ती नशा केलेली आहे तो पूर्णपणे नशेत जातो.

## पान १ वरून...

त्या नशेत त्याच्याकडून नको ते कृत्य घडते. बीड शहरामध्ये अशी नशा करणारी लहान मुले ते तरुण मंडळी मोठ्या प्रमाणात आहे. या नशेमुळे त्यांचे शारीरिक मानसिक आरोग्य बिघडत चालल्याने समाज व्यवस्थेवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे अशी नशा विक्री करणाऱ्यावर कठोर कारवाई होणे अपेक्षित आहे.

**बीडचे जिव्हाळा बेघर..**

बीड शहरातील जिव्हाळा बेघर निवारा केंद्राची निवड झाली आहे. या निवडीमुळे बीड जिल्ह्याची शान आणि मान राज्यामध्ये उंचावली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने चालू असलेले नागरी बेघर निवारा या घटकांसाठी राज्यनिहाय निवारा सह नियंत्रण समिती गटित करण्याचे निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने नागरी बेघर निवारा या घटकांच्या प्रगतीचे सनियंत्रण करण्यासाठी दि.०५ जून २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये माननीय उज्वल उके (से.नि.भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय निवाराची नियंत्रण समिती गठीत करण्यात आलेली होती. या निवड समितीने पहिल्या पाच मध्ये बीड येथील जिव्हाळा निवारा केंद्राची दखल घेऊन खऱ्या अर्थाने जिव्हाळा बेघर केंद्राला आपले स्वतःचे कुटुंब समजून त्यांची सेवा करणाऱ्या निस्वार्थ टीमचे खऱ्या अर्थाने कौतुक केले आहे असेच म्हणावे लागेल.तर जिव्हाळा बेघर निवारा केंद्राच्या कार्याची दखल राज्य सरकारने घेतल्याबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी जिव्हाळा परिवारावर शुभेच्छांचा वर्षाव करून पुढील काळासाठी तनमनधनाने सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे.

जिव्हाळा बेघरने बीड जिल्ह्याची मान उंचावली – सीईओ नीता अंधारे

मराठवाड्यातील एकमेव बीड शहरातील जिव्हाळा बेघर निवारा केंद्राची निवड राज्यातील पहिल्या पाच बेघर निवारा केंद्रामध्ये झाल्याबद्दल बीड नगर पालिकेच्या मुख्याधिकारी निता अंधारे यांनी अभिनंदन केले. त्या म्हणाल्या, जिव्हाळा बेघर निवारा केंद्राच्या माध्यमातून आरोग्य, स्वच्छता, स्वावलंबन, शिस्त आणली सांस्कृतिक ठेवा जोपासत रंजल्या गांजलेल्या समाजातील विविध घटकांची मनोभावे सेवा येथे निस्वार्थ भावनेने होत असल्यानेच बीडचे जिव्हाळा बेघर निवारा केंद्र राज्यामध्ये पहिल्या पाच मानांकरात आपले नाव करू शकला यामुळे बीड जिल्ह्याची शान आणि मान उंचावली आहे असे मनोगत व्यक्त करुन जिव्हाळा बेघर निवारा केंद्राच्या व्यवस्थापनाचे कौतुक केले.

या चौघांनी खऱ्या अर्थाने मारला यशाचा षटकार...

बीड जिव्हाळा बेघर निवारा केंद्रातील संचालक अभिजीत वैद्य, व्यवस्थापक राजू वंजारे या दोघांनी खऱ्या अर्थाने जीवाचे रान करून या निवारा केंद्रातील बेघरांना हक्काचे जिव्हाळा निर्माण करणारे घर उभे केले. या दोघांना काळजीवाहक यश वंजारे आणि महिला काळजीवाहक छाया सरोदे यांनी अनमोल साथ दिली. यामुळेच खऱ्या अर्थाने केंद्रीय समितीने दखल घेऊन पहिल्या पाच मध्ये बीड येथील जिव्हाळा बेघर निवारा केंद्राच्या व्यवस्थापनाला न्याय दिला आहे.त्यामुळेच खऱ्या अर्थाने विजयाचा षटकार आज सन्मानाने लागला आहे.

# पैठण गोदावरी नदी काठातून वाळू तस्करी होत असून लाखो रुपयाचा शासनाचा महसूल झाला बुडीत

पैठण /प्रतिनिधी

पैठण तालुक्यातील गोदावरी पात्रातून नदी काठातून दररोज केणीच्या साह्याने दिवसा , रात्री-बेरात्री हजारो ब्रास वाळू उपसा होत असून गोदावरी काठाला वाळू साठवून हायवा, मिनी हायवा , ट्रॅक्टर मध्ये भरून राजरोसपणे रात्रीची वाहतूक होत आहे. या वाळू चोरीला कोणाचेही नियंत्रण राहिलेले नाही, गोदापात्रातून वाळू तस्करी होत असलेले ठिकाण जुने कावसान, २७ गेट पुल ,पाटेगाव, वडवळी, वाघाडी , नवगाव ,हिरडपुरी , दररोज दिवसा रात्री खुलेआम हजारो ब्रास वाळू उपसा होत असून शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे .वाळू माफियांवर कोणाचेही नियंत्रण राहिलेले नाही .पैठण तालुक्यातील हद्दीत चार पोलीस स्टेशन येत असून या चारी पोलीस स्टेशनच्या समोरून दररोज वाळू चोरीचे वाहन धावत आहे तरीही वाळू माफियांवर कोणतीही कारवाई होत नाही म्हणून एका वर्षापासून होत असणाऱ्या अवैध वाळू उत्खननाला कोणाचा आशीर्वाद आहे याचीही लाच लुचपत अधिकाऱ्यांमार्फत चौकशी होणे गरजेचे आहे .या अगोदर पैठणचे तहसीलदार सारंग चव्हाण यांना लाच लुचपत विभागामार्फत अडकवण्यात आले होते , मुख्य विशेष बाब म्हणजे आता हे वाळू तस्कर जायकवाडी धरण येथील मुख्य २७ गेट लहान पुला खाली वाळू उत्खनन करत आहेत, त्यामुळे पुढे चालून जायकवाडी धरणाला धोका उद्भवू शकतो हे सत्य आहे.



दररोज विविध संघटनेचे सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार गोदावरी पात्रातून वाळू उत्खनन होत आहे, वाळू तस्करी घडामोडींचे व्हिडिओ, फोटो जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार ,पोलीस क्राईम व्हाट्सअप वर रोज पोस्ट टाकून सुध्दा संबंधित अधिकारी कुंभकर्णाच्या झोपेतुन उठत नाही, या वाळू चोरीची जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी, तरी या वरील सर्व विषयी सखोल चौकशी करून वाळू रॅकेटमध्ये कोण कोण अडकलेले आहेत, त्यांची लाच लुजपत विभागामार्फत चौकशी करण्यात यावी नसता निवासी उपजिल्हाधिकारी आणि उपविभागीय अधिकारी पैठण-फुलंब्री कार्यालय, छत्रपती संभाजी नगर येथे आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा दिनांक १३ मे २०२५ रोजीच्या निवेदना मार्फत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया डेमोक्रॅटिकचे पैठण उपाध्यक्ष इस्माईल इनामदार (पिराची) पिंपळवाडी यांनी दिला.

# भारतीयत्वाचे शिक्षण देणारी शैक्षणिक संस्था म्हणून भारतीय शिक्षण प्रसारक संस्था प्रसिद्ध.- ह.भ.प.चैतन्य महाराज देगलूरकर

## खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या नवीन वास्तूच्या भूमीपूजनाचा कार्यक्रम थाटामाटात संपन्न

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

भारतीयत्वाचे शिक्षण देणारी शैक्षणिक संस्था म्हणून भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेने नावलौकिक मिळविणारी संस्था म्हणून प्रसिद्धी शैक्षणिक गुणवत्तेतून मिळवली आहे नवीन येऊ घातलेल्या शैक्षणिक धोरणामध्येही भारतीय शिक्षण याचा समावेश करण्यात आला आहे.नवीन शैक्षणिक धोरणातून आपले भारतीय विचार विद्यार्थ्यांमध्ये रूजविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत.त्याच्या आपण शिक्षण संस्था म्हणून आपण सज्ज आहातच असे दिसते.आपल्या या होणा-या नवीन वास्तू निर्माणातून समाजात चांगले नागरीक घडावेत.यासाठी मी माझ्याकडून मनस्वी शुभेच्छा देतो व या चांगल्या कार्यासाठी संस्था म्हणून आपण मला आमंत्रित केले याबद्दल कृतज्ञता त्यांनी व्यक्त केली.

याप्रसंगी मंचावर भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलूरकर,संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंतजी वैद्य,स्थानिक व्यवस्था मंडळाचे अध्यक्ष विजय वालवडकर, स्थानिक कार्यवाह किरण कोदरकर हे उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वती,भारत माता व अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमांचे पूजनाने करण्यात आली .तत्पूर्वी माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष डॉ.अतुल देशपांडे व सौ.सुचिता देशपांडे यांच्या हस्ते पूजा विधी पार पडले.त्यानंतर ह.भ.प.चैतन्य महाराज देगलूरकर,संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य,संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलूरकर,स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष विजय वालवडकर, कार्यवाह किरण कोदरकर,माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष डॉ.अतुल देशपांडे,मुख्य प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे,डॉ.शरदराव हेबाळकर,सौ.शरयु हेबाळकर,प्रा.रा.गो.धाट सर,जिल्हा संघकार्यवाह बिपीन क्षीरसागर,सर्व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य,संस्था सभासद यांच्या हस्ते नारळ वाढवुन व कुदळ मारून भूमीपूजन संपन्न करण्यात आले.




यावेळी संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य यांनी शुभेच्छा देताना म्हणाले की,आपल्या या संकुलातून आजपर्यंत अनेक चांगले विद्यार्थी घडले आहेत.ते कार्य अविरत रहावे यासाठी शुभेच्छा दिल्या.अध्यक्षीय समारोप करताना डॉ.सुरेंद्र आलूरकर म्हणाले की,या शैक्षणिक संकुलाची शैक्षणिक गुणवत्ता चांगली आहे हे निकालावरून दिसतेच आहे. त्यात सातत्य ठेवणे आवश्यक आहे.त्यासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष विजय वालवडकर,कार्यवाह किरण कोदरकर,खोलेश्वर शैक्षणिक संकुलातील सर्व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य,माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष डॉ.अतुल देशपांडे, प्रभारी मुख्याध्यापक विवेक जोशी,खोलेश्वर प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी हेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली स व प्राथमिक,माध्यमिक,महाविद्यालयातील,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# पाटोदा बसआगाराला १० वर्षांनंतर मिळाल्या ५ बसेस

पाटोदा ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या पाटोदा आगाराला १० वर्षांनंतर पाच नव्या अत्याधुनिक बी सिक्स या बस मिळाल्या. या बसेस शहरात आल्यानंतर शहरातील प्रमुख मार्गावरून त्यांना फिरवून आगारात आणले गेले. नागरिकांनी या बसेसचे स्वागत केले. नगराध्यक्ष प्रतिनिधी राजू जाधव, गटनेते बळीराम पोटे, उपनगराध्यक्ष रोहिदास गिते, आगार प्रमुख तिडके, वाहतूक नियंत्रक नीलेश बांगर, पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते या नव्या बसवाहनांचे पूजन करण्यात आले. पाटोदा बसआगारात असलेल्या ४७ बसेस या दहा वर्षांपूर्वीच्या जुन्या होत्या. आता पावसाळ्याच्या तोंडावर पाटोदा आगारात नवीन बसेस दाखल झाल्यानंतर शुक्रवारी सकाळी प्रतिष्ठात नागरिक व कर्मचाऱ्यांकडून




जोरदार स्वागत करण्यात आले. आ. सुरेश धस यांनी दखल घेऊन विभागीय नियंत्रकांकडे नव्या बसेसची मागणी केली होती. त्यानंतर पाटोदा आगाराला ५ बसेस देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. गुरुवारी रात्री उशिरा नव्या पाच बस गाड्या दाखल झाल्या. नागरिकांनी या नव्या बसेसचे स्वागत केले. त्यानंतर प्रवासी व पदाधिकाऱ्यांना घेऊन संपूर्ण पाटोदा शहरातून नवीन बस गाड्यांची फेरी देखील काढण्यात आली. शुक्रवारी सायंकाळी या नवीन बसची पहिली फेरी मुंबईसाठी रवाना झाली. दरम्यान, या बस मिळाल्यामुळे प्रवाशांची गैरसोय दूर झाली असली तरीही आणखी नवीन बसेस देण्याची मागणी होत आहे.

आणखी ५ बसेसची मागणी

पाटोदा आगाराची स्थिती आणि उत्पन्न बघता आणखी नवीन पाच गाड्या आगाराला मिळाव्यात, अशी देखील आम्ही मागणी करणार आहोत, अशी प्रतिक्रिया राजू जाधव, गटनेते बळीराम पोटे पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे यांनी दिली.

# रेणुका विद्यालय मानूर शाळेचा दहावी निकाल १०० % टक्के

मानूर ।प्रतिनिधी

श्री नागनाथ शिक्षण प्रसारक मंडळ पाथर्डी संचलित रेणुका माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मानूर इयत्ता दहावी मार्च २०२५ बोर्ड परीक्षाचा निकाल १००% लागला असुन उज्वल यशाची परंपरा कायम राखली असुन विद्यालयात परिक्षेला ६९ विद्यार्थी प्रतिष्ठित झाले होते. त्यामध्ये विशेष प्रावीण्य विधार्थी प्रथम श्रेणीमध्ये ०६ तर द्वितीय श्रेणीमध्ये पधे ०४ विद्यार्थी उत्तीर्ण होवून रेणुका विद्यालय मानूर या शाळेचा निकाल १००% लागला आहे विद्यालयातून प्रथम क्रमांक काळे कृष्णा पांडूरंग - ९७.००% द्वितीय द्वितीय क्रमांक कदम आदित्य रोषेराव - ९४.००%,तृतीय क्रमांक सय्यद मोहमद दानिश आदम ९३.८०%, या विद्यार्थ्यांवर विविध क्षेत्रातून शुभेच्छांचा वर्षाव होताना दिसत आहे. सर्व उत्तीर्ण विद्यार्थाचे जहागिरदार मठसंस्थान मानूरचे मठाधिपती तथा श्री नागनाथ शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री ष ब्र १०८ गुरु विरूपाक्ष शिवाचार्य मानूरकर महाराज,संस्थेचे उपाध्यक्ष श्री ड : वेलदे साहेब कार्याध्यक्ष भांडकर साहेब, खजिनदार ईजारे साहेब,विद्यालयाचे प्राचार्य/मुख्याध्यापक पि. जी. पाखरे सर,सर्व प्राध्यापक व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# आष्टी येथील आ सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली तिरंगा यात्रेस उपस्थित रहा - सय्यद शहाबाज

पाटोदा /प्रतिनिधी

आष्टी पाटोदा शहरात आ सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली तिरंगा यात्रा आयोजित करण्यात आली असुन या तिरंगा सन्मान यात्रेत पाटोदा तालुक्यातील नागरिकांनी बहुसंख्येने सहभागी व्हावे असे आवाहन डोंगरकिन्ही गण प्रमुख संभाजीराजे येवले यांनी केले आहे.

भारताच्या सार्वभौमत्वाविरुद्ध सतत कारवाई करणाऱ्या दहशतवादी संघटना आणि त्यांचा पोषणकर्ता पाकिस्तान यांना धडा शिकविणारे ऑपरेशन सिंदूर भारतीय सैन्य दलांनी राबविले. पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यातील पीडितांना न्याय देणारी ही भारतीय सेनेची ऐतिहासिक कामगिरी आहे.

भारतीय सेनेच्या या दैदिप्यमान यशाबद्दल सर्व सैनिकांप्रती कृतज्ञता व सन्मानार्थ आष्टी शहरामध्ये 'सिंदुर सन्मान तिरंगा यात्रा' दि. १८मे २०२५ रोजी सकाळी८.४५ वाजता पंचायत समितीच्या कार्यालया पासून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौकातून शनीचौक, महाराष्ट्र ग्रामीण बँक छत्रपती शिवाजी महाराज चौकात समारोप होणार आहे.

भारतमातेच्या रक्षणार्थ अहोरात्र आपले प्राण पणाला लावून लढणाऱ्या भारतीय सेनादलांतील सैनिकांना या यात्रेच्या माध्यमातून मानवंदना देण्यात येणार आहे. या यात्रेत माजी सैनिकांचा व शहीद कुटुंबीयांचा देखील सन्मान करण्यात येणार आहे. यवतमाळ शहरातील देशभक्त नागरिकांनी अतिशय उत्साहात भारतीय सैन्याच्या या कामगिरीप्रती आपला अभिमान व्यक्त करण्यासाठी या तिरंगा



यात्रेत उस्फुर्तपणे सहभागी व्हावे असे आवाहन सय्यद शहाबाज तसेच आ सुरेश धस मित्रमंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# मुलीने मिळविलेले यश पाहण्यासाठी पत्रकार रईस खान हवे होते

## आशना खानम पठाणचे दहावीत सुयश

बीड ।प्रतिनिधी

शहरातील पत्रकार तथा शिक्षक मरहूम रईस खान पठाण यांची सुकन्या आशना खानम हिने नुकत्याच जाहीर झालेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत ८७.६०% गुण घेत दणदणीत यश मिळविले आहे. यामुळे एकीकडे आनंद होत असून दुसरीकडे मात्र हे यश पाहण्यासाठी तिचे वडील आज आपल्यात नाहीत याचे तिच्यासह कुटुंब आणि वृत्तपत्र क्षेत्रातील सर्वांनाच दुःख होत आहे.

आशना खानम रईस खान ही शहरातील सर सय्यद अहेमद खान उर्दू शाळेची विद्यार्थिनी आहे. तिने



८७.६०% गुण घेऊन यश संपादन केल्याने तिचे सर सय्यद अहेमद खान उर्दू शाळेचे मार्गदर्शक मुश्ताक अन्सारी, सचिव शेख वकील, मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़, दैनिक माझी सरकारचे उपसंपादक साजेद सलीम यांच्यासह प्राचार्य, शिक्षक वृंद शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक, नातेवाईक, मित्र परिवाराकडून तिचे अभिनंदन केले आहे. आशना खानम पठाण हिचे वडील तथा उर्दू दैनिक एशिया एक्सप्रेस (औरंगाबाद) आणि दैनिक तहेलका टाईम्स (नांदेड़) चे बीड जिल्हा प्रतिनिधी रईस खान पठाण यांचे काही वर्षांपूर्वी अकस्मात निधन झाले आहे. आज आशना ने मिळविलेले यश पाहण्यासाठी ते हयात नाहीत ही बाब मोठी दुःखद आहे.

## कंटेनरच्या धडकेत अनेक जखमी झालेल्याची

# राहुलभैय्या सोनवणे यांनी रुग्णालयात घेतली भेट,जखमींची केली विचारपुस



केज/प्रतिनिधी

शुक्रवारी एका कंटेनर चालकाने निष्काळजी पणे वाहन चालवून अनेक ठिकाणी रस्त्याने प्रवास करणाऱ्या निरपराध नागरिकांना चिरडले.या भीषण घटनेत काही जणांचा जागीच मृत्यू झाला असून,अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत. गंभीर जखमी नागरिका वर सध्या अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या दुर्घटनेची माहिती मिळताच बीड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे यांनी रुग्णालयाला भेट देत जखमी नागरिकांची विचारपूस केली.त्यांनी जखमी व त्यांच्या नातेवाइकांशी संवाद साधून त्यांना धीर दिला.यावेळी बोलताना राहुल सोनवणे म्हणाले की, या अपघातात अनेक निरपराध नागरिकांना गंभीर इजा झाली आहे. काहींचे डोके फुटले आहे तर काहींना फ्रॅक्चर झाले आहे.ही अतिशय दुर्दैवी व संतापजनक घटना आहे.तसेच त्यांनी प्रशासनाकडे मागणी केली की,कंटेनर चालकाला कठोर शासन करावे आणि जखमी व मृतांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत द्यावी.या दुर्घटने मुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.नागरिकांनी वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळावेत, आणि प्रशासनाने अशा घटना रोखण्यासाठी कठोरपावले उचलावीत अशी मागणी ही स्थानिकांकडून होत आहे.यावेळी काँग्रेस पक्षाचे अन्य कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.

# जय किसान माध्यमिक विद्यालयाचे घवघवीत यश

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील वाघेबाभुळगाव येथील जय किसान माध्यमिक विद्यालय यांनी इयत्ता दहावीच्या परीक्षेत उज्वल यश संपादन करत यशाची परंपरा कायम राखली आहे. जाहीर झालेल्या निकालात शाळेचा एकूण निकाल अत्यंत समाधानकारक असून विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरी केली आहे.या परीक्षेत कु.तोगे सुजाता अशोक हिने ९२.२०% गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकावला.तिच्या पाठोपाठ कु.चौरे दिव्या श्रीकांत हिने ९१.६० % गुण मिळवत द्वितीय स्थान मिळवले,तर कु. तोगे प्रिती कल्याण हिने ८९.६०% गुणांसह तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.यावर्षीच्या निकालात १८ विद्यार्थी विशेष प्राविण्य श्रेणीत, ०४ विद्यार्थी प्राविण्य श्रेणीत तर ०२ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.शाळेच्या या घवघवीत यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा प्रा. सुशीलाताई मोराळे, सचिव श्री.शिवराज पाखरे,मुख्याध्यापक श्री.सोळुंके सर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले असून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.शाळेच्या या यशामुळे संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण असूनपालक आणि ग्रामस्थांकडून शिक्षक व विद्यार्थ्यांचे कौतुक

# रायगड मध्ये आदित्य शिक्षण संस्थेचा डंका

## राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत आदित्य फार्मसीचा ऋषिकेश मोहाळे राज्यात तिसरा

बीड ।प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे, रायगड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत आदित्य फार्मसी बीड चा विद्यार्थी ऋषिकेश मोहाळे याने राज्यातून तिसरा क्रमांक मिळवला आहे. या यशाबद्दल संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी अभिनंदन केले. तर संचालक डॉ.आदित्य सारडा यांनी ऋषिकेशचा संस्थेच्या वतीने सत्कार केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ,लोणेरे, रायगड येथे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत राज्यातून ७५९ विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी व्यासपिठावर पद्मश्री मिलिंद कांबळे, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे, डॉ. अरविंद किवलेकर, डॉ. एस. एल. नलबलवार,डॉ.



विलास सरगडे, डॉ. गणेश वरखडे, डॉ. चंद्रकुमार बडोले, अशोक पवार यांची प्रमुख उपस्थितीत होती. पद्मश्री मिलिंद कांबळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे देशाच्या विकासाकरिता आर्थिक दृष्टीकोन यावर आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. लोखंडे यांनी तर आभार कुलसचिव डॉ. अरविंद किवलेकर यांनी मानले.महाविद्यालयात ऋषिकेश मोहाळे याचा संस्थेच्या वतीने संचालक डॉ. आदित्य सारडा यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.कुमार सुरवसे, विभाग प्रमुख प्रा. समीर देशमुख, प्रा. सुनील मोराळे, प्रा. विठ्ठल मुळे, प्रा. भाग्यश्री भोसले, प्रा. कोमल डोंगरे आदींची उपस्थिती होती.गुणवत्ता ही संस्थेची ओळखआदित्य शिक्षण संस्थेतील विविध महाविद्यालयातील विद्यार्थी आपल्या गुणवत्तेच्या बळावर आज देशात आणि परदेशात चांगल्या पदावर नोकरीला आहेत. अनेक जण स्वात:ची कंपनी स्थापन करून इतरांना रोजगार देत आहेत. आदित्य शिक्षण संस्थेत विद्यार्थी घडतात याचा अभिमान आहे. गुणवत्ता हीच खरी आदित्य शिक्षण संस्थेची ओळख आहे. पुन्हा एकादा राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत ऋषिकेश मोहाळे या विद्यार्थ्याने यश मिळवून ती दाखवून दिली आहे.-डॉ. आदित्य सारडा, संचालक आदित्य शिक्षण संस्था

# तुलसी समूहाच्या वतीने प्रेरणादायी पुस्तके भेट देऊन दहावी, बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

बीड ।प्रतिनिधी

वाचन हेच खरे ज्ञानाचे द्वार असून विद्यार्थ्यांनो, वाचनाला प्राधान्य द्या, पुस्तकांच्या जगात प्रवेश करा आणि ज्ञानाच्या नव्या क्षितिजांचा शोध घ्या! हीच यशाची पहिली पायरी आहे, असा संदेश देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे यांनी तुलसी शैक्षणिक समूहाच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात दिला.

फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये माध्यमिक शालांत इयत्ता १० वी आणि उच्च माध्यमिक इयत्ता १२ वी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परिक्षेत उल्लेखनीय यश संपादन केल्याबद्दल तुलसी शैक्षणिक समूहाच्या वतीने दि. १६ मे २०२५ रोजी बीड येथील तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता यात्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अद्यक्ष प्रा.प्रदीप रोडे, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.मस्के एल.एम.,प्रा.संजय घाडगे यांचेसह तुलसी इंग्लिश स्कुलच्या प्राचार्या उमा जगतकर, तुलसी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा प्रकाश ठोकणे आदी उपस्थित होते.




पुढे बोलतांना प्रा.प्रदीप रोडे यांनी सांगितले की, करिअरच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी मोबाइलचा अतिवापर टाळणे गरजेचे आहे, कारण तो वेळेचा मोठा दुष्प्रयोग करतो. त्याऐवजी पुस्तकांचे वाचन केल्यास मौलिक ज्ञान मिळते आणि नवीन कल्पनांना उत्तेजन मिळते. विद्यार्थांनो लक्षात ठेवा, जगातील अनेक अशक्य वाटणाऱ्या गोष्टी मानवाने शास्त्र, तंत्रज्ञान आणि संशोधनाद्वारे शक्य केल्या आहेत. म्हणून, कोणत्याही अडचणीला अडथळा न समजता ती दूर करण्याचा प्रयत्न करा.आजपासूनच तयारी सुरू करा, ज्ञान मिळवा आणि स्वतःला नव्या संधींसाठी सज्ज करा! असे सांगत विद्यार्थ्यांनी मिळालेल्या यशावर समाधान न मानता यापेक्षाही उज्ज्वल यश मिळवावे यासाठी शुभेच्छा दिल्या.

माध्यमिक शालांत परीक्षेत तुलसी इंग्लिश स्कूलचा विद्यार्थी राहुल बेलूरे हा ९३.२०% टक्के गुण मिळवून शाळेतून पहिला आला. असलेशा मुंडे ९२.८० टक्के गुण मिळवून दुसरी आली. तर, कुलदीप वाघमारे ९६.४० गुण मिळवून तिसरा आला. तर, उच्च माध्यमिक परीक्षेत तुलसी कनिष्ठ महाविद्यालयातील अथर्व मनोज दुगम (प्रथम क्रमांक) शब्दुली किरण कुलकर्णी( द्वितीय) वैभवी भूषण कुलकर्णी (तृतीय) कला शाखेतून वैष्णवी विनोद ठोंबरे (प्रथम क्रमांक) श्वेता विकास राऊत (द्वितीय) सुहानी गंगाधर सोनवणे (तृतीय) तर वाणिज्य शाखेतून संजना मल्लिकार्जुन आर्यनकर (प्रथम क्रमांक) अंकिता हरिदास आवटे (द्वितीय) मुंजाराम अशोक तूपसागर (तृतीय)आले आहेत, या सर्व विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ व जग बदलणारा बाप माणूस हे प्रेरणादायी पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला तसेच शालांत परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविणारे शाळेतील ०७ विद्यार्थी, उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविणारे १२ विद्यार्थी, उज्ज्वल यश संपादन करणाऱ्या इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य यांचाही सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा प्रकाश ढोकणे, सूत्रसंचालन कोमल मस्के, जे.जी. पवार मॅडम यांनी केले तर आभार प्रीती कांबळे यांनी मानले.कार्यक्रमास प्रा.अजिनाथ मस्के, प्रा.प्रकाश गायकवाड, प्रा.हनुमंत विद्यागर, प्रा.सागर सोनवणे, प्रा.निलेश जाधव, प्रा.गणेश काळे, कार्यालयीन कर्मचारी महेश उड्डाण यांचेसह मोठ्या संख्येने पालकवर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# रक्तदान शिबिर आणि माजी सैनिकांचा सन्मान करुन रणवीर पंडित यांचा वाढदिवस साजरा होणार

गेवराई ।प्रतिनिधी

शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे संचालक रणवीर अमरसिंह पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय सैन्य दलातुन निवृत झालेल्या माजी सैनिकांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. माजी सैनिकांचा सन्मान करुन रणवीर पंडित यांचा वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा होणार असल्यामुळे तरुणांमध्ये या निमित्ताने राष्ट्रप्रेम जागृत करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. शनिवार दि. १७ मे रोजी सकाळी ११ वाजता गेवराई शहरातील कृष्णाई निवासस्थानी मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी निवृत सुभेदार कॅप्टन रामकृष्ण चेडे, डॉ. मयुर सोनवणे, बळीराम गवते, अजिंक्य आनेराव यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. रक्तदान शिबीर, पेढे तुला, सामान्य ज्ञान स्पर्धा आदी समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रसंगी युवकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन शारदा स्पोर्ट्स अकॅडमीच्या माध्यमातुन करण्यात आले आहे.



गेवराई तालुक्यातील माजी सैनिकांचा भव्य सन्मान करुन शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे संचालक रणवीर अमरसिंह पंडित यांचा आगळावेगळा वाढदिवस साजरा होणार आहे. पहलगाम घटनेनंतर भारतीय सैन्याने केलेल्या कामगिरीचा प्रत्येक भारतीयांना अभिमान असुन भारतीय सैन्य दलातील जवानांप्रती आदरभाव निर्माण झाला आहे. या पार्श्वभुमीवर माजी सैनिकांचा सन्मान करुन वाढदिवस साजरा करण्याचा निर्णय शारदा स्पोर्ट्स अकॅडमी व रणवीर पंडित मित्र मंडळाने घेतला आहे. शनिवार दि. १७ मे रोजी सकाळी ११ वा. गेवराई शहरातील कृष्णाई निवासस्थानी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रसंगी निवृत सुभेदार कॅप्टन रामकृष्ण चेडे, छत्रपती संभाजीनगर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष डॉ. मयुर सोनवणे, बीड पंचायत समितीचे माजी सभापती बळीराम गवते, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अजिंक्य आनेराव यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात गेवराई तालुक्यातील माजी सैनिकांचा सन्मान केला जाणार आहे.

कृष्णाई येथे भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. मौजे मादळमोही येथे जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक राजेंद्र वारंगे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या पुढाकारातुन शनिवार दि. १७ मे रोजी सकाळी १० वा. रणवीर पंडित यांची भव्य पेढेतुला होणार आहे. गेवराई शहरातील मोहसिन शेख यांच्या पुढाकारातुन भव्य सामान्य ज्ञान स्पर्धा आणि सायंकाळी गेवराई शहरात वाढदिवसानिमित्त ठिक-ठिकाणी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आलेले आहे. कृष्णाई येथे आयोजित केलेल्या माजी सैनिकांच्या सन्मान सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन शारदा स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने करण्यात आले आहे.

# बीड शहराच्या वैभवात भर घालणाऱ्या सहकार संकुल बांधकामास ना. अजितदादा पवार यांच्याकडुन हिरवा कंदिल - आ. विजयसिंह पंडित

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातील जालना रोड परिसरात मुख्य रस्त्यालगत सहकार विभागाचा भुखंड मागील अनेक वर्षापासुन बांधकामाच्या प्रतिक्षेत आहे. या भुखंडावर सहकार विभागातील सर्व कार्यालयांसाठी एकत्रित प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करुन बीड शहराच्या वैभवात भर घालील अशी आकर्षक व देखणी वास्तु उभारावी अशी मागणी आ. विजयसिंह पंडित यांनी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांच्याकडे केली होती. ना. अजितदादा पवार यांनी सहकार संकुलाच्या बांधकामास हिरवा कंदिल दाखविला असुन प्रशासनाला या बाबतचे आदेश दिले आहेत. इमारत बांधकामाचा आराखडा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य वास्तु शास्त्रज्ञाकडुन तयार करण्याचे निर्देश प्रशासनाला मिळाले आहेत. पालकमंत्री म्हणुन बीड जिल्ह्यासाठी सहकार संकुलाची प्रशासकीय इमारत ना. अजितदादा पवार यांच्या माध्यमातुन आणि आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नातुन मिळणार आहे.



बीड शहरातील जालना रोड परिसरात मुख्य रस्त्यालगत सर्व्हे नंबर १७९९ मध्ये सहकार आयुक्त यांच्या नावाने १५१५.९४ चौरस मिटर आकारमानाचा भुखंड आहे. या शासकीय भुखंडावर सहकार विभागातील प्रशासकीय कार्यालयांसाठी सहकार संकुलाच्या इमारतीचे बांधकाम प्रस्तावित होते. शहरातील काही व्यापाऱ्यांनी खाजगी प्रयोजनासाठी या जागेची मागणी शासनाकडे केली होती. आ. विजयसिंह पंडित यांनी या जागेवर सहकार विभागातील प्रशासकीय कार्यालयांसाठी सहकार संकुलाचे बांधकाम व्हावे यासाठी पाठपुरावा व प्रयत्न केले. ना. अजितदादा पवार यांच्या पालकमंत्री पदाच्या कार्यकाळात बीड शहराच्या वैभवात भर पाडेल अशी आकर्षक वास्तु निर्माण करण्यासाठी आ. विजयसिंह पंडित यांनी ना. अजितदादा पवार यांना साकडे घातले. आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीला त्यांनी हिरवा कंदिल दाखवत सहकार संकुलाच्या बांधकामास मान्यता दिली आहे.

जिल्हा उपनिबंधक, सहाय्यक निबंधक, देखरेख संघ यासह सहकार विभागातील लेखा परिक्षण विभागाची कार्यालये आणि सहकार विभागाशी संबंधित प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र सहकार संकुलात समाविष्ट करुन ही सर्व कार्यालये एका छताखाली आणुन सहकार विभागाची मुख्य प्रशासकीय इमारत बांधण्याचा मार्ग या माध्यमातुन मोकळा झाला आहे. पालकमंत्री म्हणुन ना. अजितदादा पवार यांच्या कार्यकाळात बीड शहराच्या वैभवात भर घालणारी शासकीय वास्तु जिल्हायाच्या ठिकाणी उभारत असल्याचे समाधान आ. विजयसिंह पंडित यांनी व्यक्त केले आहे.

# मानूरकर महाराज माध्यमिक विद्यालय हिवरसिंगा शाळेचा दहावी निकाल १०० % टक्के

मानूर ।प्रतिनिधी

श्री नागनाथ शिक्षण प्रसारक मंडळ पाथर्डी संचलित हिवरसिंगा येथील मानूरकर महाराज माध्यमिक विद्यालयच्या विद्यार्थ्यांनी उज्वल यशाची परंपरा कायम राखली असुन इयत्ता दहावी मार्च २०२५ एस एस सी बोर्ड परीक्षाचा विद्यालयाचा निकाल १००% लागला आहे.विद्यालयातून प्रथम क्रमांक कु. गायकवाड नंदिनी शिवाजी=८९.८०% , द्वितीय द्वितीय क्रमांक कु.सय्यद नाजिया सदृदिन=८९.६०%, तृतीय क्रमांक कु.शिंदे आरती लहू=८८.८०%. या विद्यार्थ्यांवर हिवरसिंगा गावातून शुभेच्छांचा वर्षाव होताना दिसत आहे. सर्व उत्तीर्ण विद्यार्थाचे जहागिरदार मठसंस्थान मानूरचे मठाधिपती तथा श्री नागनाथ शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री ष ब्र १०८ गुरु विरूपाक्ष शिवाचार्य मानूरकर महाराज,संस्थेचे उपाध्यक्ष श्री ड : वेलदे साहेब कार्याध्यक्ष भांडकर साहेब, खजिनदार ईजारे साहेब,विद्यालयाचे मुख्याध्यापक शेख सर,सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच समस्त ग्रामस्थ हिवरसिंगा येथील सर्व गावकरी यांनी विशेष अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




# विद्यार्थ्यांनी अकरावी विनामूल्य ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या सुविधांचा लाभ घ्यावा - प्राचार्य डॉ. संजय गवई

लातूर ।प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून कला, वाणिज्य, विज्ञान आणि तत्सम विषयाच्या अकरावी प्रवेशासाठी ऑनलाइन पद्धतीचा प्रथमच अवलंब केला आहे. त्यासाठी महात्मा बसवेश्वर महाविद्यालय आणि देशीकेंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे विनामूल्य सुसज्ज संगणक, तज्ञ शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि सर्व सोयी सुविधा उपलब्ध केल्या आहेत याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. संजय गवई यांनी केले.

श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलीत महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेसबंधी प्राचार्य कक्षामध्ये बैठक आयोजित करण्यात आली होती यावेळी ते बोलत होते.या बैठकीला उपप्राचार्य प्रा. वनिता पाटील, पर्यवेक्षक प्रा. गोविंद पांढरे, कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखा समन्वयक आणि कार्यालय प्रमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना प्राचार्य डॉ. गवई म्हणाले की,शैक्षणिक वर्ष २०२५-२६ अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियासाठी सुसज्ज संगणक तज्ञ, शिक्षक



आणि शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तेव्हा आपण या संधीचा लाभ घेऊन आपला प्रवेश निश्चित करावा असे सांगून एस.एस.सी. परीक्षा २०२५ मध्ये उज्वल यश संपादन करणारे विद्यार्थी आणि पालक यांचे अभिनंदन केले.

# आष्टी मध्ये आज भव्य तिरंगा यात्रा

## नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे - आ.सुरेश धस



आष्टी ।प्रतिनिधी

ऑपरेशन सिंदूरच्या यशाबद्दल आष्टी शहरांमध्ये भव्य तिरंगा यात्रा आज रविवार दिनांक १८ मे २०२५ रोजी सकाळी ८:४५ वा. हुतात्मा स्मारक, पंचायत समिती, आष्टी येथुन आष्टी शहरांमध्ये निघणार आहे. तरी या भव्य तिरंगा यात्रेत नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे अशी विनंती आमदार सुरेश आण्णा धस यांनी केली आहे.

भव्य तिरंगा यात्रेची सुरुवात हुतात्मा स्मारक, पंचायत समिती, आष्टी येथून होणार आहे. पंचायत समिती प्रांगण - लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौक - छत्रपती शिवाजी महाराज चौक - शनि चौक - कापड बाजार मार्गे - महाराष्ट्र ग्रामीण बँक - छत्रपती शिवाजी महाराज चौक आष्टी या मार्गाने भव्य तिरंगा यात्रा निघणार असून छत्रपती शिवाजी महाराज चौक आष्टी येथे भव्य तिरंगा यात्रेचा समारोप होणार आहे. या भव्य तिरंगा यात्रेचे आयोजक आ. सुरेश आण्णा धस व भारतीय जनता पार्टी आष्टी, पाटोदा, शिरुर हे असून या भव्य तिरंगा यात्रेमध्ये सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शेवटी आ. सुरेश धस यांनी केले आहे.

# चिंचोलीमाळी येथील अतिक्रमण हटविण्यात यावे अन्यथा २७ मे रोजी आमरण उपोषण करणार- रोहन गलांडे

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील नागबेट वस्ती ते नामदेव महाराज तीर्थक्षेत्र परीसरातील व ग्रामीण महामार्ग हद्दीत येणारे अतिक्रमण तात्काळ हटविण्यासाठी दि.२६ एप्रिल रोजी आत्मदहना चा दिला होता परंतु आपण दिलेल्यापत्राद्वारे ३० दिवसाचा वेळ मागितला आहे तरी आपण ३० दिवसात अतिक्रमण हटविण्यात आले नाही तर दि.२७ मे २०२५ रोजी आमरण उपोषण करणार आहे तरी उपोषणा दरम्यान मला काही झाले तर यास बांधकाम विभाग पंचायत समिती केज व प्रशासन जबाबदार राहील.या विषयी सविस्तर वृत्त असे की, चिंचोली माळी येथील नागबेट वस्ती ते नामदेव महाराज तीर्थक्षेत्र परीसरातील बांधकाम विभाग केज यांच्या हद्दीतयेणारे अतिक्रमण तात्काळ हटविण्या साठी दि.२६ एप्रिल रोजी आत्मदहन करण्याचा इशारा सार्वजनिक बांधकाम विभाग केज यांना देत आहे तरी आंदोलन दरम्यान मला काही झाले तर प्रशासन जबाबदार राहील असे निवेदनाद्वारे आपणांस कळविण्यात येत आहे तरी ३० दिवसात अतिक्रमण हटविण्यात यावे ही कळकळीची विनंती प्रशासनाला निवेदनात करण्यात आली आहे.





# सिद्धी विनायक गणपती मंदिर यशवंतनगर येथे संकष्ट चतुर्थी निम्मित गायत्री यज्ञ संपन्न

बीड ।प्रतिनिधी

गायत्री तिर्थ शांतिकुंज हरिद्वारच्या आशीर्वादाने व्यक्तीमध्ये सद्बुद्धी व सत्प्रेरणा जागविण्यासाठी गायत्री परिवारातर्फे जागोजागी सामुदायिक यज्ञाचे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. या कार्याचे प्रणेते तपोनिष्ठ वेदमूर्ती पंडित श्रीराम शर्मा आचार्य यांच्या प्रेरणेने दिनांक १६/०५/२०२५ शुक्रवार वैशाख वद्य संकट चतुर्थी निमित्त गायत्री यज्ञाचे आयोजन करण्यात आले होते.या यज्ञाचे यजमान- गायकवाड साहेब सह परिवारअ.वि.गा.परिवार बीड हे होते.

शिध्दिविनायक गणपती मंदिर यशवंत नगर बीडचे अध्यक्ष ड मंगेश पोकळे सर यांच्या मार्गदर्शनाखाली हा यज्ञ करण्यात आला.या गायत्री यज्ञाला पुरोहित म्हणून गायत्री परिवाराचे बीड जिल्हा समन्वयक मोहन महाराज खरमाटे, व रत्नपारखी काका यांनी होते.यावेळी यशवंत नगर मधील असंख्य भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.वीर जवानांसाठी व राष्ट्रासाठी आहुती

सध्या राष्ट्रामध्ये युद्ध परिस्थिती आहे. या युद्धात काही जवान देशासाठी शहीद झाले. त्याच्यासाठीही आहुती देण्यात आली तसेच राष्ट्राला ही आहुती अर्पण करण्यात आली.

गर्भ संस्कार

गायत्री यज्ञ वेळी गर्भवती मातेवर गर्भ संस्कार करण्यात आले. व होणाऱ्या बाळा वर काही अरिष्ठ येऊ नये म्हणून ग्रंथराज ज्ञानेश्वरी वाचन करणे, भगवंताचे नामस्मरण,आणि दररोज गायत्री मंत्र पठन करण्यास सांगितले सामूहिक आरती होऊन कार्य कर्माची सांगता झाली.





# दहावीच्या परीक्षेमध्ये भक्ती लाडला मिळाले १०० टक्के

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

येथील सेंट अँथनी इंग्लिश स्कूल, अंबाजोगाई येथील इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थिनी भक्ती बालासाहेब लाड हिने इयत्ता दहावीच्या परीक्षेमध्ये १०० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. भक्तीने गणित आणि संस्कृत या विषयांमध्ये १०० पैकी १०० गुण मिळवले असून, कला क्षेत्रातील गायन विषयातील प्राविण्याबद्दल अतिरिक्त गुण मिळाल्यामुळे तिचे एकूण गुण १०० टक्के झाले आहेत. तिच्या या उत्तुंग यशाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे. शाळेच्यावतीने तसेच पालक, शिक्षक आणि शिक्षण क्षेत्रातील व्यक्तींनी भक्तीला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# दिमाखवाडीच्या सानिका देवकर, रोहण देवकरचे दहावीच्या परीक्षेत यश





गेवराई ।प्रतिनिधी

सेंट झेवियर्स स्कूल, गेवराई च्या सानिका संतराम देवकर हिने दहावीच्या परीक्षेत ९४.६० टक्के तर व्दारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय, बीडच्या रोहन बप्पासाहेब देवकर या विद्यार्थ्याने ९१.४० टक्के घेऊन यश संपादन केले. या यशाबद्दल दोघांचेही सर्वत्र अभिनंदन होत आहे.

दिमाकवाडी तालुका गेवराई येथील सानिका संतराम देवकर या विद्यार्थीनिने मराठीमध्ये ९१, हिंदी ८४, इंग्रजी ९६, गणित ९६, विज्ञान आणि तंत्रज्ञान ८९, सामाजिक विज्ञान ९८ गुण मिळवत यश संपादन केले. तर रोहण बप्पासाहेब देवकर याने मराठीमध्ये ८८, संस्कृत ९३, इंग्रजी ८७, गणित ७६, विज्ञान आणि तंत्रज्ञान ९६, सामाजिक विज्ञान ९३ गुण मिळवले आहेत. या यशाबद्दल सानिक आणि रोहनचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# कु.नुपुर उपाध्ये हिचे यश



अंबड/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या निकालात अंबड येथील श्रीमती चंद्रप्रभा स्वरूपचंद कासलीवाल जैन इंग्लिश स्कुलची विद्यार्थीनी कु.नुपुर किरण उपाध्ये हीने ९२.४० टक्के गुण घेत घवघवीत यश संपादन केले आहे.या यशाबद्दल तीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# नांदरच्या उपसरपंचपदी आसमानराव काळे यांची बिनविरोध निवड

पैठण प्रतिनिधी

नांदर / ज्ञानेश्वरवाडी (ता.पैठण) ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी आसमानराव काळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यापुर्वीच्या उपसरपंच वर्षाताई रेवणनाथ कर्डिले यांनी राजकीय तडजोडी नुसार अडीच वर्षानंतर राजीनामा दिला होता.मंडळ अधिकारी बी.आर.खेडकर यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी रोजी झालेल्या सदस्यांच्या बैठकीत ही निवड प्रक्रिया पूर्ण झाली.यावेळी तलाठी श्रीमती स्वाती खुपटे, ग्रामसेवक खंडुजी विर, रविंद्र गायकवाड आदींनी निवड प्रक्रियासाठी मदत केली.

यावेळी सरपंच विजय गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य प्रविण काळे,गिताताई तळपे, संगीताताई यशवंतराव काळे कांबळे, रामचंद्र काळे, रेवननाथ कर्डिले संदीप काळेअंकुश सोनवणे, हसिनाबी पठाण,यशवंत काळे, वर्षाताई कर्डिले, वंदनाताई



मगरे, रंजनाताई नाचन हे सदस्य उपस्थित होते.या निवडीचे ग्रामपंचायतचे सर्व सदस्य सोसायटीचे चेअरमन सर्व सभासद आदींनी अभिनंदन केले आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अँण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# कृषि विद्यापीठात उद्या खरीप पीक परिसंवाद आणि कृषि प्रदर्शन

## तज्ज्ञ शास्त्रज्ञांच्या चमूमार्फत समस्यावर आधारित शेतकर्यांना मार्गदर्शन

परभणी ।प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या ५३ व्या वर्धापन दिनानिमित्त विस्तार शिक्षण संचालनालय आणि कृषि विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार १८ मे रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या सुवर्ण जयंती दीक्षांत सभागृहात खरीप पीक परिसंवाद व कृषि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणी पुरवठा व स्वच्छता, उर्जा, महिला व बालकल्याण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) तथा पालकमंत्री श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि राहणार आहेत. कार्यक्रमास राज्यसभा सदस्य खासदार श्रीमती फौजिया खान, लोकसभा सदस्य खासदार संजय जाधव, विधान परिषद सदस्य व कार्यकारी परिषद सदस्य आमदार सतीश चव्हाण, विधान परिषद सदस्य आमदार विक्रम काळे, विधानसभा सदस्य व कार्यकारी परिषद सदस्य आमदार डॉ. राहुल पाटील, विधानसभा सदस्य आमदार रत्नाकर गुट्टे, विधानसभा सदस्य व कार्यकारी परिषद सदस्य आमदार रमेशराव कराड, विधानसभा सदस्य व कार्यकारी परिषद सदस्य आमदार अभिमन्यू पवार आणि विधानसभा सदस्य आमदार राजेश विटेकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. पुणे येथील कृषि परिषदेचे महासंचालक रावसाहेब भागडे (भाप्रसे), परभणीचे जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे (भाप्रसे), महाराष्ट्र शासनाचे माजी कृषि आयुक्त उमाकांत दांगट हे कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी आहेत. विद्यापीठ कार्यकारी परिषद सदस्य विठ्ठल सकपाळ, सुरज जगताप, प्रविण देशमुख, दिलीप देशमुख, डॉ. आदिती सारडा, भागवत देवसरकर, डॉ. कौशिक बॅनर्जी, डॉ. व्ही. एम. मायंदे, विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. खिजर बेग, शिक्षण संचालक डॉ. भगवान आसेवार, कुलसचिव संतोष वेणीकर, नियंत्रक प्रवीण निर्मळ, विद्यापीठ अभियंता श्री. दीपक कशाळकर आदींची कार्यक्रमास उपस्थिती राहणार आहे.

परिसंवादात विद्यापीठाचे शास्त्रज्ञ विविध खरीप पिकांच्या लागवड तंत्रज्ञानावर मार्गदर्शन करणार आहेत. यामध्ये सोयाबीन, तूर, कापूस, ज्वारी, बाजरी, कडधान्ये, भरड धान्यांचे महत्त्व, तसेच कीड व रोग व्यवस्थापन आदी विषयांचा समावेश आहे. यावेळी शेतकरी बांधवांच्या कृषी विषयक शंकांचे निरसन करण्यात येणार आहे. कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते विद्यापीठ शास्त्रज्ञांनी लिहिलेल्या विविध घडीपत्रिका, पुस्तिका व शेतीभाती मासिकाचे प्रकाशन करण्यात येईल. त्याचबरोबर विद्यापीठाने विकसित केलेल्या तंत्रज्ञानावर आधारित कृषी साहित्याचे प्रदर्शनही आयोजित करण्यात आले आहे.या कार्यक्रमात शास्त्रज्ञांसह प्रगतशील शेतकर्यांचे मार्गदर्शन होणार असून एकाच ठिकाणी तज्ज्ञ शास्त्रज्ञांच्या चमूमार्फत समस्यावर आधारित चर्चा घडवून आणण्यात येईल. यामध्ये पिकानिहाय उद्योजकता विकास, शेतीपूरक व्यवसाय आणि शेतीत वैविध्य जपण्याच्या दृष्टिकोनातून शेतकर्यांना उपयुक्त मार्गदर्शन दिले जाईल, अशी माहिती कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी सांगितले.

# शहरासह परिसरात अवकाळी पावसाने झोडपले

## वादळी वार्यामुळे तारांबळ : पाठोपाठ पावसानेही काढले झोडपून



परभणी ।प्रतिनिधी

परभणी महानगरासह परिसरास शनिवारी चार ते साडेचार वाजेच्या सुमारास ढगाळ वातावरणा पाठोपाठ विजांच्या कडकडाटासह सोसाट्याच्या वार्याने व अवकाळी पावसाने अक्षरशः झोडपून काढले. गेल्या चार दिवसांपासून शहरासह जिल्ह्यातील वातावरण पूर्णतः बदलले आहे. विशेषतः तापमानात मोठ्या प्रमाणावर चढ उतार होत आहे. गेल्या दोन दिवसांपूर्वीच शहराच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर पाऊस झाला. शहरातसुध्दा हलका पाऊस झाला. त्या पाठोपाठ शनिवारीही दुपारी वातावरण बदलल्यानंतर वादळी वार्यासह विजांच्या कडकडाटात पावसास प्रारंभ झाला. सुरुवातीस हलका पाऊस झाला, परंतु नंतर मूसळधार पावसाने झोडपून काढले. अवकाळी पावसाच्या या आगमनाने सर्वसामान्य नागरीकांची मोठी तारांबळ उडाली. वाहनधारकांनी लगेचच आडोसा शोधला.

वर्हाडांना बसला मोठा तडाखा...

शहरासह जिल्ह्यात सकाळपासून दुपारी उशीरापर्यंत मोठ्या प्रमाणावर लग्न सोहळे आयोजित करण्यात आले होते. त्यामुळे रस्त्या रस्त्यांवर वाहनांची मोठी गर्दी उसळली होती. शहरातील वाहतूक व्यवस्था पूर्णतः ठप्प होती. त्यातच पावसाच्या आगमनाने वातावरण बदलून गेले. तत्पूर्वीच्या सोसाट्याच्या वार्यामुळे ग्रामीण भागातील सुविधा नसणार्या लग्नस्थळास या पावसाने वार्याने झोडपून काढले. त्यामुळे वर्हाडी मंडळींचे अक्षरशः हाल झाले, नुकसानही झाले.



# टीआरपी मिळवण्यासाठी संजय राऊतांचा प्रयत्न: उपसभापती नीलम गो-हे

परभणी ।प्रतिनिधी

आपणच कसे सर्वश्रेष्ठ आहोत हे दाखविण्याचा प्रयत्न 'नरकातला स्वर्ग' या संजय राऊत यांच्या पुस्तकाच्या माध्यमातून केला जात असून केवळ टीआरपी मिळविण्याचा प्रयत्न असल्याची टीका विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गो-हे यांनी केली.

परभणी येथे शिवसेना (शिंदे) पक्षाच्यावतीने लाडक्या बहिणीच्या मेळावा निमित्त त्या परभणीत आल्या असता पत्रकारांशी बोलत होत्या. पुढे त्या म्हणाल्या की खासदार संजय राऊत यांनी सत्याग्रह करून किंवा आंदोलने करून जेलमध्ये गेले नाहीत तर ते अफरातफरीच्या प्रकरणात जेलमध्ये गेले. त्यांच्या 'नरकातला स्वर्ग' या पुस्तकातुन केवळ आपणच कसे श्रेष्ठ आहोत हे दाखविण्यासाठी व आपला टीआरपी वाढविण्यासाठी आहे का असे त्या म्हणाल्या. पुढे बोलताना त्या म्हणाले की, राज्यातील लाडक्या बहिणी या महायुती सरकारवर समाधानी आहेत. महिलांना सक्षम करण्यासाठी सरकार कटीबद्ध असून येत्या काळात महिलांसाठी आरोग्य शिबिरे घेऊन त्यांना औषधोपचार दिले जाणार आहेत. समाधान शिबिराच्या माध्यमातून महसूल विभागाची विविध कागदपत्रे तसेच दाखले जागेवरच मिळविण्यासाठी मेळावे घेतले जाणार असून महिलांना अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे गो-हे म्हणाल्या.

यावेळी मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन, लोकसभा प्रमुख राजु कापसे, जिल्हाप्रमुख आनंद भरोसे, विशाल कदम, माजी खा. सुरेश जाधव, महिला आघाडीच्या गिता सुर्यवंशी, सखुबाई लटपटे, माधव कदम, वावरे, माणिक पौढे आदि उपस्थित होते.

# यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवलं पाहिजे



## प्राचार्य डॉ. विनायकराव कोठेकर : नूतनच्या ७४ विशेष गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

परभणी ।प्रतिनिधी

संस्कार संपणारे नसतात तर ते चिरकाल टिकणारे असतात. विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी अभ्यासात सातत्य ठेवले की, यश मिळते. मला जिंकायचे आहे आणि जिंकण्यासाठी मला लढायचे आहे. ही जिद्द विद्यार्थ्यांनी ठेवायला हवी. स्वसामर्थ्य, क्षमता वाढवून कठोर परिश्रम करायला हवेत. तरच मिळालेले यश टिकते, असे प्रतिपादन संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. विनायकराव कोठेकर यांनी नूतन विद्यालय शिक्षण संस्थेच्यावतीने आयोजित विशेष गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभात केले.

नूतन विद्यालय, नूतन महाविद्यालय, बाहेती बिहाणी नूतन इंग्लिश स्कूल, श्रीमती ल.ला.रा. नूतन कन्या प्रशाला व श्रीमती तेजीबाई कन्हैयालाल अग्रवाल नूतन कन्या उच्च माध्यमिक विभागातील माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून यशस्वी झालेल्या ७४ विशेष गुणवंत, खेलो इंडिया युथ गेम स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविलेला विद्यार्थी, आणि घटक संस्था यांचा विशेष गुणवंत सत्कार समारंभ शुक्रवारी (दि. १६) नूतन विद्यालयाच्या कै. रा. ब. गिल्डा सभागृहात उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. एस. एम. लोया होते. तर व्यासपीठावर संस्थेचे सहसचिव जयप्रकाश बिहाणी, मुख्याध्यापक संतोष पाटील, उपमुख्याध्यापक परसराम कपाटे, सपना पाटणी हे उपस्थित होते. कार्यक्रमास कार्यकारिणी सदस्य नंदकिशोर बाहेती, प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, मकरंद दिग्रसकर, राजेश गुप्ता, अजिज खा पठाण, नूतन विद्यालय शालेय समितीचे अध्यक्ष सिताराम मंत्री, उपमुख्याध्यापक किरण देशपांडे, पर्यवेक्षक प्रा. प्रविण सोनवणे, रोहीदास मोगल यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना प्राचार्य डॉ. विनायकराव कोठेकर म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नूतन विद्यालय शिक्षण संस्था कटिबद्ध आहे. गुणवंत विद्यार्थी ही नूतन विद्यालय शिक्षण संस्थेची संपत्ती आहेत. संस्थेतील यशस्वी विद्यार्थ्यांमुळे संस्था व घटक संस्थांचा नावलौकिक वाढतो, असे म्हटले. कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थी स्वराज जाधव, वैष्णवी पिंपळगावकर, तृप्ती शहाणे, विभूती जामदार, मानसी मोरेगावकर, भक्ती शेलार यांनी मनोगत व्यक्त केले. संगीत शिक्षक सच्चिदानंद डाखोरे यांनी स्वागत गीत सादर केले. प्रास्ताविक जयप्रकाश बिहाणी यांनी केले. तर विशेष गुणवंतांसह घटक संस्था, घटक संस्था प्रमुख, शिक्षक यांचाही सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभामागिल भुमिका प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी मांडली. सुत्रसंचलन प्रा. संजय पिंपळगावकर यांनी केले. आभार प्रदर्शन प्राचार्य एन.पी.पाटील यांनी केले. विशेष गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभास गुणवंत विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी पुढाकार घेतला.

# आयुक्त साहेब, बाकी सारे ठीक पण भूमिकेबद्दल साशंकता!

## प्रशासनाचा कॅप्टन पूर्वग्रहदूषित असला की गडबड होते आणि अधिकारी- कर्मचार्यांमध्ये अविश्वासाची भावना वाढीस लागते । विश्वास देण्याची भूमिका आयुक्तांना घ्यावी लागणार

सारिपाट / प्रशांत बाफना

नगर शहरात नक्की काय चालू आहे हे कोणीच सांगू शकत नाही. शहराच्या पालकत्वाची जबाबदारी ज्या महानगरपालिकेवर आहे तिथे सध्या प्रशासक राज आहे. प्रशासक म्हणून आयुक्त असणारे यशवंत डांगे हे काम पाहत आहेत. कामांचा निपटारा आणि अधिकाधिक पारदर्शी कारभार करण्यावर त्यांचा भर असला तरी महापालिकेच्या आरोग्य विभागातील आर्थिक घोटाळ्यात आरोग्य अधिकार्यावर गुन्हा नोंदविण्याच्या प्रक्रियेत पहिल्यापासूनच आयुक्तांची भूमिका संशयास्पद वाटत होती. गुन्हा दाखल झाल्यानंतर त्याचा तपास पोलिस कर्मचार्याने नव्हे तर उपअधीक्षक दर्जाच्या अधिकार्याने केला आणि त्या गुन्ह्यात आरोग्य अधिकारी डॉ. बोरगे यांचा काडीमात्र संबंध नसल्याचे पत्र त्यांनी न्यायालयाला दिले. त्यामुळे बोरगे यांचे नावच त्यातून वगळण्यात आले. बोरगे यांचा संबंध नसताना त्यांना आरोपी करण्यास आयुक्त डांगे यांचीच भूमिका कारणीभूत ठरली. बोरगे यांनी आयुक्तांच्या सोयीची भूमिका घेतली नाही अथवा ते सांगतील तसे काम केले नाही म्हणूनच बोरगे यांच्यावर पूर्वग्रहाने गुन्हा दाखल केला असाच त्याचा अर्थ आता निघत आहे. आयुक्त हे महापालिकेच्या टिमचे कप्तान आहे. कप्तानाने सर्वांना सोबत घेऊन काम करायचे असते. पूर्वग्रह ठेवून कोणतेच काम होणार नाही. बोरगे यांच्यानंतर आयुक्त आपल्यालाही आरोपी करतील अशी भावना आता सार्याच अधिकारी आणि कर्मचार्यांमध्ये वाढीस लागली आहे. त्यामुळे महापालिकेत जे वातावरण तयार झाले आहे त्यास कॅप्टन या नात्याने आयुक्तच जबाबदार आहेत. जे झाले ते झाले! सर्वांना सोबत घेत नव्या विश्वासाने काम करण्याची भूमिका आयुक्तांना घ्यावी लागणार आहे आणि त्यातूनच महापालिका प्रशासनात विश्वासाचे वातावरण तयार होईल. त्यात कोणाचे नसले तरी नगरकरांचे हित आहे आणि हे हित जपण्याचे काम कॅप्टन या नात्याने आयुक्तांना करावे लागणार आहे.

महापालिकेच्या आरोग्य विभागात शासकीय निधीच्या घोटाळाप्रकरणी तत्कालीन आरोग्य अधिकारी डॉ. अनिल बोरगे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, बोरगे यांचा प्रकरणात काही एक संबंध नसल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. त्यामुळे या प्रकरणातून बोरगे यांचे नाव वगळण्यात आले आहे. शहर विभागाचे पोलिस उपअधीक्षक अमोल भारती यांनी तसे पत्र जिल्हा न्यायालयाला दिले आहे. आरोग्य सुविधांसाठी १५ व्या वित्त आयोगाकडून निधी मिळतो. या माध्यमातून मिळालेल्या निधीतून १६ लाख ५० हजार रुपयांचा अपहार झाल्याचे चौकशीत समोर आले होते. याबाबत महापालिकेचे प्रभारी आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फेब्रुवारी- २०२५ मध्ये फिर्याद दिली होती. त्यावरून महापालिकेच्या आरोग्य विभागातील आरोग्य अभियानाचे शहर लेखा व्यवस्थापक विजयकुमार महादेव रणदिवे व तत्कालीन वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. अनिल बोरगे यांच्यावर गुन्हा दाखल झाला. पोलिसांनी दोघांना अटक केली. दरम्यान, गुन्हा दाखल झाल्याने डॉ. बोरगे यांना महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी निलंबित केले. कोतवाली पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रताप दराडे यांनी स्वत:च या प्रकरणाचा तपास केला. आरोग्य विभागातील शासकीय निधी, ऑनलाइन प्रणाली, निधी वितरणाचे अधिकार आदींबाबत तपास करण्यात आला. या तपासात अपहाराशी डॉ. अनिल बोरगे यांचा काहीएक संबंध नसल्याचे समोर आले. त्यामुळे दराडे यांनी सदर गुन्ह्यातून बोरगे यांचे नाव वगळण्याबाबतचा अहवाल पोलिस उपअधीक्षक अमोल भारती यांना सादर केला होता. त्यानुसार पोलिस उपअधीक्षक भारती यांनी अपहराच्या गुन्ह्यात बोरगे यांच्याविरोधात दोषारोपत्र दाखल करण्याइतपत पुरावा नाही. त्यामुळे या प्रकरणातून बोरगे यांना वगळण्यास परवानगी देण्यात येत असल्याचे न्यायालयाला पत्राद्वारे कळविले.

मुळातच या प्रकरणाशी डॉ. बोरगे यांचा काहीच संबंध आढळून आला नव्हता. मात्र, तरीही पूर्वग्रह दुषीत असल्याने बोरगे यांना आरोपी केले गेले. पोलिसांनी केलेल्या तपासानुसार हा निधी ट्रान्सफर करताना लेखा व्यवस्थापक रणदिवे यानेच त्याची अधिकृत की वापरली होती. त्याने त्याच्या नावावरच मोबाइलचे सीम घेतलेले होते. या नंबरवरून त्याने हे पैसे ऑनलाइन वापरले असल्याचे तपासात समोर आले आहे. यात बोरगे यांचे नाव कुठेही दिसत नाही.

# श्री विनायकराव माध्यमिक विद्यालयाचे दहावीच्या परीक्षेत घवघवित यश

बीड (प्रतिनिधी)

श्री विनायकराव माध्यमिक विद्यालय, वैद्यकिन्ही ता.पाटोदा जि. बीड या शाळेने नुकत्याच घोषित झालेल्या दहावी बोर्ड परीक्षेत उज्वल यश मिळवले असून शाळेचा निकाल १००% टक्के लागलेला असून विद्यालयातून कु. जोगदंड सुजाता बबन ९३.४०% गुण घेऊन सर्वप्रथम आली आहे. चिरंजीव. बांगर विशाल त्रिंबक ९३% टक्के गुण घेऊन दुतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. चि. बावणे पार्थ मधुकर ९२.२० टक्के गुण घेऊन तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. या शिवाय कु. बावणे अंकिता सिताराम ९२% ची. ओमकार विष्णू आजबे ८९ % कु. बांगर राजश्री रामकिसन ८८.८०% चि. येडे वैभव कुंडलिक ८८ ६०% कु. कदम पुनम भास्कर ८७. ४०% याप्रमाणे अनेक विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले असून सदरील यशाबाबत संस्था सचिव भागवत (अण्णा) आजबे संस्था अध्यक्ष बाजीराव (अण्णा) बांगर संस्था पदाधिकारी मुख्याध्यापक श्री. बांगर सर व शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी भरभरून शुभेच्छा दिल्या.

# महात्मा फुले यांच्या प्रतिमेची समाज कंटकांनी केली विटंबना चिंचोलीमाळी गावातील ग्रामस्थ संतप्त,केज पोलिसात तक्रार

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील मौजे चिंचोली माळी येथे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेची अज्ञात व्यक्तींकडून विटंबना झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकारामुळे गावात संतापाची लाट उसळली असून, ग्रामस्थांनी पोलीस ठाणे केज येथे लेखी तक्रार दाखल केली आहे.

दि.१२ मे २०२५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त जिजाऊ महिला मंडळाच्या वतीने गावात महात्मा फुले यांना अभिवादन करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमानंतर काही अज्ञात व्यक्तींनी महात्मा फुले यांच्या प्रतिमे वरील पुष्पहार फेकून दिला आणि अपमानकारक कृत्य केल्याचे ग्रामस्थांनी निदर्शनास आणून दिले.

गावातील नागरिक आणि महिलांनी याचा तीव्र निषेध केला असून सामाजिक सलोखा बिघडविण्याचा प्रयत्न झाल्याची भावना व्यक्त केली आहे.याबाबत पोलिस निरीक्षकांना दिलेल्या निवेदनात दोषींवर तात्काळ गुन्हा दाखल करून कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.याघटनेमुळे गावात तणाव निर्माण झाला असून,पोलिस प्रशासनाने सतर्कता बाळगली आहे.केज पोलीस ठाण्याचे अधिकारी या घटनेचा तपास करत असून, लवकरच दोषींवर कारवाई केली जाईल, असे आश्वासन देण्यात आले आहे.सदर प्रकरणामुळे सामाजिक संघटनांनी संताप व्यक्त केला असून,शांतता आणि बंधुभाव राखण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या उपस्थितीत ग्रामपंचायत भार्डी येथे एक दिवस गावकऱ्यासोबत ग्राम दरबार




जालना ।प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील मौजे भार्डी ग्रामपंचायत येथे जिल्हा परिषद जालनाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत विभाग जालनाचे उदयसिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली अंबड पंचायत समिती अंतर्गत असलेले मौजे भार्डी ग्रामपंचायत मध्ये एक दिवस गावकऱ्यासोबत ग्राम दरबार उपक्रम घेण्यात आले आहे.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद जालनाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत विभाग तथा गटविकास अधिकारी पंचायत समिती अंबड उदयसिंग राजपूत उपस्थित होते.यावेळी अंबड पंचायत समितीचे विस्तारधिकारी व्ही.बी.बनाटे, ए.ए.चव्हाण, पी.जी.शिंगणे, सरपंच नवनाथ तुकाराम डोईफोडे, उपसरपंच नासेर भाई, ग्रामपंचायत सर्व सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी वैराळ,पशू संवर्धन अधिकारी, आरोग्य अधिकारी,कृषी विभाग, स्वच्छ भारत अभियान विभाग, अंगणवाडी सुपरवायझर, सर्व अंगणवाडी सेविका, अशा सेविका मदतनीस,ग्राम पंचायत कर्मचारी व गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG



# लाभले आम्हास भाग्य...

'लाभले आम्हास भाग्य, बोलतो मराठी...' हे वाक्य आपण मोठ्या अभिमानाने म्हणत असलो, तरी याच मराठी भाषेची तिची जन्मभूमी असणाऱ्या महाराष्ट्रात अवहेलना होताना वारंवार दिसत आहे. राज्य माध्यमिक मंडळाच्या दहावीच्या निकालामुळे सगळीकडे आनंद व्यक्त होत होत असताना समस्त मराठीजनांसाठी हा निकाल लाजिरवाणाच म्हणावा लागेल. महाराष्ट्राची मातृभाषा जी मराठी आहे, जिला नुकताच अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे, त्याच मराठी विषयात दहावीत राज्यातील तब्बल ३८ हजार ४३७ विद्याथ नापास झाले आहेत. या निकालावर एक नजर टाकली तर इंग्रजीपेक्षाही महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना आपली मातृभाषा मराठी कठीण जात असल्याचे दिसते. कारण इंग्रजीच्या तुलनेत मराठी विषयामध्ये नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सहापटीने जास्त आहे. मराठी विषयात ३८ हजार ४३७ विद्याथ नापास, तर इंग्रजीत सहा हजार ७३८ विद्याथ अनुत्तीर्ण झाले आहेत. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला म्हणजे आपण मैदान मारले असे नाही, तर मराठी ही महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीच्या बोलण्यात, मनात ठासवली गेली पाहिजे, तरच तिचा अभिजात दर्जा टिकून राहील, पण आज अनेक उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या मराठी घरांमधून मराठीला दुय्यम मानले जाते. त्याऐवजी हिंदी व त्याहीपेक्षा मराठीला अधिक प्राधान्य दिले जाते. इंग्रजांनी आपल्याला पारतंत्र्यातून मुक्त केले असले, तरी त्यांच्या भाषेचे गारुड आजही मनावर आहे. मुंबई ही जशी देशाची आर्थिक राजधानी आहे तशीच ती महाराष्ट्राची राजधानी आहे. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रासाठी १०८ हुतात्मांनी हौतात्म्य पुकारले आहे. मात्र, आज याच मुंबईत मराठीची गळचेपी सुरू आहे. मराठी भाषा सोडा, पण या महानगरी मुंबईतून मराठी माणूसच हद्दपार होण्याचा मार्गावर आहे. लोकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर नेहमीच राजकारण करणाऱ्या राजकीय नेत्यांन देखील याबाबत काही सोयरसूतक नाही. मराठी माणसांच्या जीवावर मोठ्या झालेल्या काही राजकीय संघटनांनी आपल्या तत्त्वांनाच तिलांजली दिल्यामुळे मराठी माणूस आणि मराठी भाषेबद्दल त्याला पुन्हा मायेचा पाझर फुटला, तर तो त्याच्या राजकीय स्वार्थासाठी फुटू शकतो. काही संघटनांनी राज्यातील दुकानांवर मराठीत बोर्ड असावेत म्हणून खळखट्ट्याकसारखे प्रयोग केले. मात्र, त्यांच्या या आंदोलनाला म्हणावा तसा प्रतिसाद व राजकीय पाठबळही मिळाले नाही. मराठीजनांपासून दूर जात असलेल्या या संघटना आता राजकीय अंधारात आपले अस्तित्व शोधताना दिसत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात मराठी




भाषेबरोबर मराठी माणूसदेखील एकाकी पडला आहे. महाराष्ट्राला देशाची आर्थिक राजधानी समजले जाते. त्यामुळे अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कंपन्या, संस्था यांना आपले कार्यालय अथवा शाखा महाराष्ट्रात असावी, असा अट्टहास असतो. पण त्यांना येथील मराठी भाषा व मराठी माणसाची लज असावी असे त्यांचे कामकाज असते. मराठीला तुच्छ मानून हिंदी व बहुतांश इंग्रजी भाषेतूनच त्यांचे व्यवहार सुरू असतात. येथील कॉर्पोरेट संस्कृती पाहून याठिकाणी धोतर व डोक्यावर गांधी टोपी घालून जाण्यास मराठी माणूस लाजतो. संगणक क्रांती आणि त्यानंतर आलेली मोबाईल क्रांती यामुळे मराठीची अधिकच गळचेपी झाली आहे. आपण मुक्त व्यापार धोरण स्वीकारल्यामुळे व्यापारात भरभराट झाली असताना, मराठी भाषेपासून आपण मात्र दुरावत चाललो आहोत. कारण व्यापारासाठी इंग्रजी ही वैश्विक भाषा बनली आहे. संगणक क्रांती, वाढते व्यापारीकरण यामुळे इंग्रजी भाषेने अनेक शब्दांना जन्म दिला. मात्र, या इंग्रजी शब्दांना पर्यायी मराठी शब्द शोधण्यात आपण कमी पडलो. काही पर्यायी शब्द मराठी भाषेने जन्माला घातले असले, तरी ते उच्चारताना आपली त्रेधातिरपीट उडते. महाराष्ट्रातील सर्वच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या व्यावसायिक कार्यालयातून मराठीला दुय्यम स्थान दिले जात असताना, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यालयांनादेखील आता मराठी भाषा व माणसांची लज आहे की काय, असे वर्तन त्यांच्याकडून होताना दिसत आहे. साधारण तीन महिन्यांपूव मराठी भाषा दिनाच्या पूर्वसंध्येला मराठी भाषेची गळपेची काढणारे परिपत्रक उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे राजकीय 'ठाणे' ओळखल्या जाणाऱ्या ठाणे महापालिकेने काढले होते. मराठी भाषेतून एम.ए.चे शिक्षण घेतलेल्या कर्मचाऱ्यांना यापुढे अतिरिक्त वेतनवाढ न देण्याचा निर्णय ठाणे महापालिकेने घेतला होता. मात्र, मनसेचे आंदोलन आणि समाजमाध्यमांवरील वाढत्या दवाबामुळे महापालिका प्रशासनाने हा निर्णय रद्द केला. अशाच प्रकारे २०२० मध्ये मराठी शाळांच्या घटत्या पटसंख्येचे कारण पुढे करून व त्यांना मिळणाऱ्या अनुदानावर लक्ष ठेवून अनुदानित मराठी शाळांना अनुदानाचे स्वरूप कायम ठेवून पूर्ण इंग्रजी माध्यमात परावर्तित करण्याचा प्रस्ताव एका शिक्षक संघटनेने शिक्षण आयुक्तालयाकडे पाठवला होता. आज महाराष्ट्रातून मराठी शाळाच हद्दपार होत असताना विद्यार्थ्यांकडून मराठीत पास होणे सोडा पैकीच्या पैकी गुणांची अपेक्षा कधी धरावी? आज इंग्रजीपेक्षाही विद्यार्थ्यांना मराठी भाषा कठीण वाटत आहे. कारण दिवसेंदिवस मराठी भाषेतील तज्ज्ञांची संख्या कमी होत आहे. जे आहेत ते कामचलाऊ मराठी शिकवतात. काना, मात्रा, वेलांटी या मराठी भाषेतील शृंगाराबाबत त्यांना काही देणे-घेणे नाही. त्यामुळे मराठी विषयात नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वर्षागणिक वाढतच आहे. भाषेला केवळ राजाश्रय मिळून चालत नाही, तर तिला लोकाश्रय मिळाला पाहिजे. कारण बोलण्यातूनच भाषा समृद्ध होत जाते. संस्कृती, परंपरा, भावभावना हे भाषेला समृद्ध करणारे घटक आहेत. भाषेचा शोध लागला म्हणूनच विज्ञान-तंत्रज्ञानाचा शोध लागला. आज अनेक वर्षांच्या संघर्षानंतर मराठी भाषेला अभिजात दर्जा म्हणजे राजाश्रय लाभला असला, तरी लोकाश्रयापासून ती दुरावत चालली आहे. मराठीला आपण मनात स्थान दिले तरच ती आपल्या ओठावर येईल. मात्र, मराठी भाषेला आपण मनातच स्थान देण्यास तयार नाही. त्यामुळे 'लाभले आम्हास भाग्य, बोलतो मराठी...' हे वाक्य केवळ स्वगतच राहते की काय, अशी शंका येऊ लागली आहे.

प्रशांत बाफना/अहिल्या नगर जिल्हा प्रतिनिधी ८०५५४४०३८५

---

# कै.डॉ.भाऊसाहेब देशमुख विद्यालयाचा निकाल शंभर टक्के

## उज्वल यशाची परंपरा कायम


मुक्रमाबाद ।प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील कै.डॉ.भाऊसाहेब देशमुख विद्यालयाचे उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे .या वर्षी एस.एस.एसी.बोर्ड माध्यमिक शालांत परीक्षा २०२५ चा निकाल नुकताच जाहीर झाली असून.कै.डॉ.भाऊसाहेब देशमुख विद्यालयातील विध्यार्थी १.केरुरे संजय चंद्रकांत ९५.२० % घेऊन केंद्रातून सर्वप्रथम २.बनसोडे जिजाई अशोक ९२.००% ३.भासवाडे दिक्षा व्यंकटराव ९१.००% ४.बामणे मनोरमा संतोष ९०.८०% ५.आवळे अनुराधा मष्णाजी ९०.६०% शाळेचा एकूण निकाल १०० % सेमी इंग्रजीचा निकाल १०० विद्यार्थी एकूण १०२ विद्यार्थ्यांपैकी १०२ विद्यार्थी उत्तीर्ण सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे सचिव मा. रामरावजी भोसले, प्रा. सतिष नलवाडे प्रा. आशुतोष पाटील, मुख्याध्यापक बी.एस. मोरे, शिवकुमार बोधने, घोणशिकर सर, राजू भोसले, के. व्ही. जाधव, परगे सर, काळे सर, राठोड सर, बनवा सर, बिरादार मॅडम, पाटील मॅडम, भंगे मॅडम, भाले मॅडम, तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सेवक पत्रकार बांधव यांच्यासह गावातील अनेक मान्यवरांनी अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

# जवेरीया जहांगीर खान पठाण हिचे दहावीच्या परीक्षेत सुयश

बीड /प्रतिनिधी

बळवंतराव कदम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येळंबघाट येथील विद्यार्थिनी पठाण जेवरिया जहांगीर खान हिने इयत्ता दहावीच्या परीक्षेत ८७.८०% घेत घवघवीत यश प्राप्त केले



आहे. तिच्या या सुयशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

प्रतिकूल परिस्थितीवर मात करत पठाण जवेरीया जहांगीर खान या विद्यार्थिनीने दहावीच्या परीक्षेत चांगले यश मिळवल्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक खाकरे सर आणि वर्गशिक्षक सुरवसे सर यांच्यासह शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थिनीचे वडील जहांगीर खान सिकंदर खान आणि आई हिना जहांगीर खान यांनी तिचे कौतुक करून अभिनंदन केले आहे.

# तनिष्का तेलभरे हीचा इस्त्रोच्या युविका वैज्ञानिक कार्यक्रमात सहभागबद्दल सेलूतील प्रिन्स इंग्लिश स्कूलद्वारे तनिष्काचे स्वागत

सेलू ।प्रतिनिधी

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या (इस्रो) प्रतिष्ठित युविका (युवा वैज्ञानिक कार्यक्रम) वैज्ञानिक प्रशिक्षण कार्यक्रमात सेलू येथील प्रिन्स इंग्लिश स्कूलची गुणवंत विद्यार्थिनी कु. तनिष्का अनंत तेलभरे ही सहभागी होणार आहे. त्याकरीता आज सकाळी ७:३० वाजता ती सेलू रेल्वे स्थानकावरून अहमदाबाद, गुजरात येथे रवाना झाली. हा कार्यक्रम १७ मे ते २ जून या कालावधीत अहमदाबाद येथील अंतराळ उपयोग केंद्र येथे आयोजित केला आहे.

कु. तनिष्काला निरोप देण्यासाठी शाळेचे प्रतिनिधी सेलू रेल्वे स्थानकावर उपस्थित होते. यावेळी तिला शाळेचे अधिकृत पत्र सुपूर्द करण्यात आले. तसेच तिच्या यशस्वी सहभागासाठी आणि सुरक्षित प्रवासासाठी औपचारिक शुभेच्छा देण्यात आल्या. इस्रोचा युविणीका कार्यक्रम हा शालेय विद्यार्थ्यांना अंतराळ तंत्रज्ञान, अंतराळ विज्ञान आणि त्याच्या उपयोगांबद्दल मूलभूत ज्ञान प्रदान करणारा असून, विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्राधान्य देतो. हा दोन आठवड्यांचा निवासी कार्यक्रम आहे, ज्यामध्ये प्रख्यात शास्त्रज्ञांशी संवाद, प्रयोगशाळा भेटी, हाताने प्रयोग, रोबोटिक्स आणि रॉकेट मॉडेलिंग यासारख्या उपक्रमांचा समावेश आहे.

शाळेच्या मुख्याध्यापकांनी सांगितले, कु. तनिष्काची या कार्यक्रमासाठी निवड ही शाळेसाठी अभिमानास्पद बाब आहे. ती आपल्या मेहनतीने आणि समर्पणाने शाळेचे नाव उज्ज्वल करेल, याची आम्हाला खात्री आहे. तनिष्कानेही आपले विचार व्यक्त करताना म्हटले, इस्रोच्या या कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळणे हा माझ्यासाठी सन्मान आहे. मी माझे सर्वोत्तम देईन आणि शाळेचा गौरव वाढवीन.

या यशस्वी निवडीबद्दल श्रीराम प्रतिष्ठान सेलू चे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय रोडगे, सचिव डॉ. सविता रोडगे, प्रशासकीय अधिकारी प्रा. महादेव साबळे, प्रिंसिपल कार्तिक रत्नाला, प्रगती क्षीरसागर, विज्ञान शिक्षक नारायण चौरे, इतर शाळेचे शिक्षक, पालक आणि सहकारी विद्यार्थ्यांनी तनिष्काचे अभिनंदन केले असून तिच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तनिष्काच्या या प्रवासाने इतर विद्यार्थ्यांनाही विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित क्षेत्रात करिअर करण्यासाठी प्रेरणा मिळेल, अशी आशा आहे.

---

# अजिंक्य विद्या मंदिर वाशी येथील कु. भराटे प्राची पुरुषोत्तम

या मुलीने इयत्ता दहावीच्या परीक्षेमध्ये तब्बल ८९% गुण मिळवून गाठले यशाचे शिखर.

बीड /प्रतिनिधी

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील शेतकरी कुटुंबातील पारा या गावची कु भराटे प्राची पुरुषोत्तम या मुलीने सेल्फ स्टडी करून बुद्धी कौशल्य पूर्वक अभ्यास करून कुठल्याही प्रकारचा क्लास बाहेरचा न लावता वडिलांना कुठलाही शैक्षणिक खर्चात न टाकता सेल्फ घरी बसून स्टडी करून इयत्ता दहावीच्या परीक्षेमध्ये उत्कृष्ट आणि मिरीट मध्ये येऊन वाशी येथील अजिंक्य विद्यामंदिर या स्कूलचे नाव लौकिक करून भराटे कुटुंबाचे नाव अजिंक्य करण्यामध्ये प्राची या मुलीला यश मिळाले असून कु. प्राची या मुलीने तब्बल ८९% गुण इयत्ता दहावीच्या परीक्षेमध्ये मिळून यशाचे शिखर गाठले आहे भविष्यामध्ये



प्राचीला कॉम्प्युटर इंजिनियर होऊन जनसेवा करायची आहे असे प्राची या मुलीने प्रसार माध्यमासी सी बोलताना आपले अभ्यासपूर्वक विचार व्यक्त केले प्राची ने मिळवलेल्या या ८९% मार्कामुळे प्राची या मुलीचे सर्वत्र धाराशिव जिल्ह्यामधून वाशी तालुक्यामधून तिने केलेल्या उत्कृष्ट अभ्यास कौशल्याचे सर्वत्र कौतुक होत आहे व तिचे सर्वत्र अभिनंदन होत असून प्राची या मुलीला पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी सर्वांच्या वतीने मनस्वी शुभेच्छा मिळत आहेत प्राची या मुलीचा आदर्श वाशिम तालुक्यातील तसेच धाराशिव जिल्ह्यातील इतर मुलींनी घेण्यासारखा आहे असेही शुभेच्छा देणाऱ्या व्यक्तींकडून बोलण्यात येत आहे कारण की कु प्राची या मुलीने आपल्या स्वतःच्या वडिलांना कुठलाही खर्च शैक्षणिक बाबतीत न करायला लावता कुठलाही क्लास लावण्यासाठी आपल्या वडिलाला तिने खर्चात ना टाकता स्वतः सेल्फ घरी बसून स्टडी करून हा अभ्यास करून तिने हे यश दहावी मध्ये खणखणीत गुण मिळवून संपादन केले आहे म्हणून हा आदर्श इतर मुलीनेही धाराशिव जिल्ह्यातील घेण्यासारखा आहे असे बोलले जाते

# चौसाळयातील जानकी लॉज,बियरबारचा परवाना रद्द करावा

## जिल्हाधिकारी व बीड पोलीस अधीक्षकांना नागरिकांनी केली निवेदनातून मागणी

बीड /प्रतिनिधी

सोलापूर धुळे राष्ट्रीय महामार्ग बीड तालुक्यातील चौसाळा येथील राजरोस, दिवसाढवळ्या वेश्या व्यवसाय चालत असल्याने चौसाळा येथील जानकी लॉज, बीअरबारचा परवाना रद्द करण्यात यावा अशी मागणी नागरिकांनी पोलीस अधीक्षक यांना निवेदनातून केली आहे.

सोलापुर-धुळे राष्ट्रीय महामार्ग क्र.५२ (जुना क्र.२११) वर चौसाळा ता. बीड हद्दीत (पो.स्टे. नेकनुर ता. बीड) दशरथ तानाजी थोरात रा.चौसाळा ता.बीड यांचे मालकीचे जानकी लॉज,बिअरबार रेस्टॉरंट चौसाळा यामध्ये गेल्या राजरोस पणे वेश्या व्यवसाय चालु आहे. ही बाब पोलीस स्टेशन नेकनुर येथील सर्व अधिकारी कर्मचारी यांना माहीत असून देखील कारवाई केली जात नाही विशेष म्हणजे चौसाळा पोलीस चौकी या हॉटेल पासुन फक्त २०० मिटर अंतरावर आहे.

सदर जानकी बिअरबार रेस्टॉरंट ॲड लॉजिंग, चौसाळा ता. बीड येथे वेश्या व्यवसाय चालु असल्याने मा.श्री. पंकज कुमावत साहेब (खझड) यांनी धाड धाकुन तेथील पिडीत महिलांची सुटका केली व जानकी बिअरबार रेस्टॉरंट ॲड लॉजिंग, चौसाळा चे मालक व चालक श्री. दशरथ तानाजी थोरात रा.चौसाळा यांचे विरुद्ध पो.स्टे. नेकनुर येथे गु.र.न.०२१४/२०२३ दि.२९/०७/२०२३ अन्वये स्त्रीया व मुली अनैतीक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम-१९५६ (सिट अधिनियम पुननिर्मीत) चे कलम ३, ४, ५ व ७ नुसार गुन्हा नोंद होवुन त्यांना अटक झालेली असुन तो सध्या जामीनावर सुटलेला आहे. तसेच मा. ५ वे न्याय दंडाधिकारी बीड यांचे न्यायालयात रेग्यलर क्रमीनल केस क्र. ७६०/२०२३ ने प्रकरण चालु आहे.

२ तसेच सदर जानकी बिअरबार रेस्टॉरंट ॲड लॉजिंग, चौसाळा वर नुकतीच मा. श्रीमती वर्षा व्हगाडे पोलिस निरीक्षक अनैतीक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, पोलिस अधिक्षक कार्यालय बीड यांनी पुन्हा धाड टाकुन परराज्यातील पिडीत महिलांची सुटका केली आहे. तसेच मालक श्री. दशरथ तानाजी थोरात रा. चौसाळा याचे विरुद्ध गु.र.न.०१०२/२०२५ दि.०६/०५/२०२५ अन्वये स्त्रीया व मुली अनैतीक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम-१९५६ (सिट अधिनियम पुननिर्मीत) चे कलम ३, ४, ५ व ७ तसेच भारतीय न्याय संहिता (बी.एन.एस.) २०२३ चे कलम १४३(२), १४३(३) नुसार गुन्हा नोंद असुन बार मालक फरार आहे.

जानकी बिअरबार रेस्टॉरंट ॲड लॉजिंग, चौसाळा चे मालक श्री. दशरथ तानाजी थोरात -रा.चौसाळा यांचे विरुद्ध पो.स्टे. नेकनूर येथे गु.र.न. १४६/२०१९ नुसार भा.द.वि.३५३ नुसार गुन्हा नोंद असुन हायपर प्रकरण ३ रे अतिरीक्त न्यायधिश बीड यांचे समोर सेशन केस क्र.२५७/२०१९ नुसार चालु आहे.

थोरात कुटुंब हे गुंड प्रवृत्तीचे कुटुंब असुन त्यांचे दारु चे व इतर तत्सम दोन नंबरचे धंदे आहेत. दशरथ तानाजी थोरात याचे विरुद्ध जानकी बिअरबार रेस्टॉरंट ॲड लॉजिंग, चौसाळा येथे राजरोस पणे वेश्या व्यवसाय चालवत असल्याने विविध गुन्हे नोंद आहेत..

जानकी लॉज व बियरबार मध्ये राजरोस पणे दिवसा रात्री वेश्या व्यवसाय चालु असुन तेथे राज्यातील तसेच परराज्यातील महिला मुली आणून त्यांच्याकडून वेश्या व्यवसाय केला जातो. या लॉच्या काही अंतरावर एक महाविद्यालय असून विद्यार्थी व विद्यार्थिनीवर याचा विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे चौसाळा परिसराची नाहक बदनामी होत आहे.या करीता जानकी बिअरबार रेस्टॉरंट ॲड लॉजिंग चा परवाना कायमस्वरुपी रद्द करुन सदर इमारत सिल करण्यात यावी अशी मागणी या परिसरातील नागरिकांनी निवेदनातून बीड पोलीस अधीक्षक यांना दिली आहे.बीड शहर व परिसरात देखील अनेक लॉजवर वेश्या व्यवसाय तसेच अल्पवयीन जोडताना रूम दिल्या जात आहेत त्या लॉजवर पोलीस अधीक्षकांनी कारवाई करून कायमस्वरूपी परवाना रद्द करण्यात यावा करण्यात यावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

---

# गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान आजच्या पिढीसाठी मार्गदर्शक :प्रा.जगदीश गवळी

कळंब(प्रतिनिधी)

गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दोघेही मानवतेच्या उद्धारासाठी कार्यरत असलेले महान विचारवंत होते. बुद्धांचे करुणा, अहिंसा व मध्यममार्गाचे तत्त्वज्ञान आणि बाबासाहेबांचे समता, बंधुता, शिक्षण व सामाजिक न्यायाचे विचार हे आजच्या समाजासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. या दोन महामानवांचे विचार केवळ धार्मिक किंवा सामाजिक मर्यादांपुरते न राहता, ते एक न्यायपूर्ण आणि समतामूल्य समाजरचनेसाठी दिशादर्शक ठरतात असे मत प्रा जगदीश गवळी यांनी व्यक्त केले.

कळंब तालुक्यातील भोसा येथे समतेचे युवा पर्व अंतर्गत भिम जयंती व बुद्ध पौर्णिमेनिमित्त आयोजित गौतम बुद्ध व बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान समजून घेताना या विषयावर ते बोलत होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गावच्या सरपंच सौ मंगलाताई विलास तौर या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून रमेश देशमुख, डॉ.संदीप तांबारे,मारुती देशमुख, कुंदन कांबळे, भगवान ओव्हाळ, विलास तौर,ड खूने,प्रा. डॉ.समाधान चंदनशिवे, बबलू शेख ,इरफान शेख,हसन मुलानी , श्रीमान , रोहित ताकपिरे आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना प्रा . गवळी यांनी मूलभूत हक्क आणि कर्तव्य, विविध कलमानुसार घटनेमध्ये केलेल्या आरक्षणाच्या, शिक्षणाचा अधिकार यावर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की शिक्षण हा परिवर्तनाचा मूलाधार असून, बाबासाहेबांनी दिलेला शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हा मंत्र आजही तितकाच प्रभावी आहे. तथागत गौतम बुद्ध,शिवराय ,फुले शाहू, आंबेडकरांचा खरा विचार हा



शोषणमुक्तीचा होता हे समजून घेतलं पाहिजे असेही ते म्हणालेड्ढ यावेळी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते वक्तृत्व, निबंध ,सामान्य ज्ञान स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका सौ प्रतिभा चंदनशिवे यांनी केले तर प्रास्ताविक व आभार प्रा . डॉ.समाधान चंदनशिवे यांनी मानले.

# चौसाळा येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी

चौसाळा /प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चौसाळा येथे प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची सार्वजनिक जयंती मोठया उत्साहात व विविध समाजउपयोगी कार्यक्रम घेऊन साजरी करण्यात आली सकाळी १० वाजता धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक भव्य अभिवादन सभा आयोजित केली होती यावेळी सामाजिक कार्यकर्ते विवेक(बाबा)कुचेकर यांच्या शुभहस्ते धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करण्यात आले यावेळी असंख्य मावळे मोठया सख्यंने उपस्थीत होते. सकाळी ११ वाजता चौसाळा शहरातुन भव्य मोटार सायकल रेली काढण्यात आली ही रॅली चौसाळा बायपास येथिल धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौकात देखील अभिवादन करण्यात आले यावेळी कृषी उत्तपन्न बाजार समिती बीड चे संचालक दिपक(भाऊ)काळे, सुधाकर गुंजाळ, सामाजिक कार्यकर्ते विवेक कुचेकर, सुरज सोनवणे, धर्मवीर संभाजी महाराज जयंती उत्सव समितीचे



संस्थापक प्रदीप जोगदंड, जयंती अध्यक्ष समर्थ शिंदे, उपाध्यक्ष बबलू शिंदे, सचिव आदीत्य हावळे, कोषाध्यक्ष आमोल कांबळे ईत्यादी मान्यवरांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तर ११-३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी विविध जाती धर्मातील ५१ रक्तदात्यानी रक्तदान केले तर संध्याकाळी ०५ वाजता हनुमान मंदीर चौसाळा येथुन धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली या मिरवणुकत प्रमुख आकर्षण आहील्यानगर जिल्हयातील कर्जत येथिल स्वरसंगम बॅन्जो व धाराशिव जिल्हयातील वाशी तालुक्यातील तांदळवाडी येथील भव्य रथ हे प्रमुख आकर्षण होते तर या मिरवणुकी दरम्यान चौसाळा शहरातील प्रत्येक महापुरुषांच्या चौकाला पुष्पहार अर्पण करण्यात आले या मिरवणुकीत प्रत्येक जाती धर्मातील मोठया संख्येने सामील झाले होते हा जयंती सोहळा यशस्वी करण्यासाठी संदेश खिवसरा, अंगद शिंदे, विजयराजे शिंदे, अतुल भैय्या शिंदे, मधुकर तोडकर, राजेश (अप्पा)नाईकवाडे, तुकाराम जोगदंड, नानासाहेब शिंदे,सुधाकर गुंजाळ,सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे संस्थापक प्रदीप (भाऊ)जोगदंड, यांच्या मार्गदर्शनाखाली हा जयंती सोहळा मोठया उत्साहात पार पडला यावेळी सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष समर्थ शिंदे, उपाध्यक्ष बबलू शिंदे, सचिव आदित्य हावळे, कोषाध्यक्ष आमोल कांबळे यांच्यासह

स्वप्निल हुंबे,तुषार नाईकवाडे, गणेश औताडे, रोहित जोगदंड, शैलेश जोगदंड, सुरज जोगदंड, सचिन नाईकवाडे,बंटी शिंदे, पंकज शिंदे,उमेश जोगदंड, अमर नाईकवाडे,सागर शिंदे,विकास शिंदे,विठ्ठल कळासे विकास नाईकवाडे,प्रसाद जालन, जगदीश हुंबे, सुरेश साळुंखे, सचिन इटकर,चंदन राहीज, युवराज जोगदंड, अक्षय कळसे, ज्ञानेश्वर जोगदंड,कृष्णा जोगदंड, श्रीजीत गुंठाळ,प्रताप शिंदे, सुरज हुंबे, रामु जोगदंड, कोंडीराम जोगदंड, मोहन शिंदे, नितीन शिंदे ,समाधान नाईकवाडे यांच्यासह असंख्य शिवप्रेमी मोठया संख्येने उपस्थीत होते.